दहा

६ जून १९७०

चाळीस पैसे

# माणूस



लोकप्रिय ग्रंथाची संस्कारित, सचित्र दुसरी आवृत्ती

# नाझी भस्मासुराचा उदयास्त

नाझी भस्मासुराचा उदयास्त

नाझी भस्मासुराचा उदयास्त

लेखक : रा. म. शास्त्री

किंमत : प्रसिद्धीनंतर
रुपये पचवीस सुमारे

प्रसिद्धीपूर्व
सवलतीची किंमत
रुपये चौदा

सवलतीची मुदत : ६ जून ते १५ ऑगस्ट १९७०
रजिस्टर पोस्टाने ग्रंथ हवा असल्यास रुपये दोन अधिक.
रक्कम मनिऑर्डरने पाठवावी. कार्यालयातही स्वीकारली जाईल.

राजहंस प्रकाशन
१०२५ सदाशिव
पुणे ३०

६ जून १९७०

# माणूस


| | | |
|---|---|---|
| वर्ष : दहावे<br>अंक : एक | संपादक<br>श्री. ग. माजगावकर | सहाय्यक<br>दिलीप माजगावकर<br>सौ. निर्मला पुरंदरे |
| किंमत<br>चाळीस पैसे | वार्षिक वर्गणी<br>वीस रुपये | परदेशची वर्गणी<br>चाळीस रुपये |


निजलेल्या आत्म्याच्या निबिड अंधःकारी
दिव्य गतिगरुडा तूं घे पुन्हा भरारी !
सोनेरी स्वप्नपंख पसरवीत आता........
घेरे उड्डाण उंच पुसट रामपारी !

—सुरेश भट

साप्ताहिक माणूस : १०२५ सदाशिव, पुणे ३० : दूरध्वनी : ५७३५९

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मताशी 'माणूस' साप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. ललित साहित्यातील पात्रे काल्पनिक.

# मुंबईतील लाल असंतोष!

मार्क्स, लेनिन आणि स्टालीनशी नाते सांगणारा भारतातील महान क्रांतीकारी पक्ष–भारतीय कम्युनिस्ट पक्ष–पोलीसांचे संरक्षण मागतो आहे. जगात कुठेच घडू शकत नाही अशा गोष्टी आपल्या देशात घडतात. पोलीस संरक्षणाखाली कम्युनिस्टांचे क्रांतिकार्य? नुसते ऐकून लेनिन आणि स्टालीन यांचे आत्मे खडबडून जागे होतील आणि माओ खदाखदा हसू लागेल! पण तसे काहीतरी होते आहे. चक्क मुंबईत! भारतीय कम्युनिस्ट पक्षाचा जन्म जिथे झाला आणि जिथे तो पक्ष वाढला, देशातील कामगार चळवळींना जिथून प्रेरणा मिळाल्या त्या मुंबईत दलितांच्या क्रांतीचा लाल झेंडा मिरविणाऱ्या कम्युनिस्ट पक्षाला आता पोलीस संरक्षणाची आवश्यकता भासू लागली आहे! अरेरे! काय ही अवस्था! क्रांतीचा एवढा अध:पात! कुठे आहेत पक्षाचे क्रांतिवीर कार्यकर्ते? कुठे आहेत त्यांचे अनुयायी? कुठे आहेत त्याचे कामगार? की मुंबईत या पक्षाला आता कुणी अनुयायीच उरले नाहीत?

परळच्या दळवी बिल्डिंगमध्ये भारतीय कम्युनिस्ट पक्षाच्या मुंबई शाखेची कचेरी आहे. गेल्या दोन तीन वर्षात या कचेरीवर एक दोन धाडी पडून गेल्या आहेत. गेल्या एक मेच्या दिवशी म्हणे काही तरुणांना (कम्युनिस्ट) म्हणतात शिवसेनेच्या लोकांनी धमक्या दिल्या, तुमच्या कचेरीवर हल्ला करू म्हणून. तीन मे या दिवशी एक हल्ला झालाही. हे प्रकरण जेव्हा असेंब्लीत निघाले तेव्हा कोण आरडाओरड झाली! आघाडीचे कम्युनिस्ट आमदार गुलाबराव गणाचार्य यानी तर फक्त रडायचे तेवढे बाकी ठेवले होते. तीन पोलीस पहाऱ्यावर असताना एवढे लोक कचेरीत घुसलेच कसे हा त्यांचा सवाल!

मुंबईचे कम्युनिस्ट कार्यकर्ते या पिछेहाटीचा आता गंभीरपणे विचार करू लागले आहेत. सयुक्त महाराष्ट्र आंदोलनाच्या वेळी प्रचंड लोकशक्ती गोळा करणाऱ्या कम्युनिस्ट पक्षाला झालं आहे तरी काय? कार्यकर्ते म्हणतात आमचे पुढारी लागले आहेत दिल्लीच्या नादी. त्यांचं सारं लक्ष आहे कसंही करून बाईंना पाठिंबा देऊन दिल्ली सरकार वाचवायचं कस याकडे. त्यामुळे इकडे लक्ष नाही. आम्ही काही पवित्रे घेतो म्हटल तर आम्हाला सबुरीचा सल्ला! काही आदेश नाहीत. आपणहून काही करतो म्हटलं तर पुढाऱ्याचा पाठिंबा नाही. म्हणजे आमचे हात

बाधलेले. आणि तसेच आम्ही डोक्यावर पडणारे दगड सहन करायचे.

काही लोक या पीछेहाटीचा संबंध रशियाच्या कच्छपी लागलेल्या जगातील साऱ्याच उजव्या कम्युनिस्ट चळवळीच्या पीछेहाटीशी जोडतात. सर्वदूर, विशेषतः आशियात, माओवादी डाव्या कम्युनिस्ट चळवळीला जोर येत आहे तर उजव्या कम्युनिस्टांची पीछेहाट होत आहे. याचे कारण उजव्या कम्युनिस्टांचे 'सुधारणा-वादी' धोरण. जहालपणा सोडून अवलंबिलेली तडजोडवादी मवाळ वृत्ती. याही बाबतीत आता या कार्यकर्त्यांमध्ये मतभेद माजू लागले आहेत. १९७२ मध्ये आम्हाला मुंबईतील एकही जागा मिळणार नाही असे कम्युनिस्ट कार्यकर्तेच स्वतः सांगतात. महाराष्ट्रातून विधानसभेवर निवडून आलेल्या आमदारापैकी १–२ तरी कमी होतील. आणि डाव्या कम्युनिस्टांचे सामर्थ्य मात्र नक्कीच वाढेल. याला कारण त्यांचा आत्मविश्वास आणि लढाऊ वृत्ती. 'आमचा कम्युनिस्ट पक्ष म्हणजे माणसाळलेला वाघ झालेला आहे. त्याची कोणाला भीतीच वाटत नाही.'

नुकत्याच झालेल्या कम्युनिस्ट पक्षाच्या एका बैठकीत काही तरुण कार्यकर्त्यांनी पक्षाच्या या मवाळ धोरणावर सडकून टीका केली आणि आक्रमक पवित्रे स्वीकारण्याचे आवाहन केले. अर्थातच ही सूचना फेटाळली गेली. आणि जरूर पडेल तेव्हा आक्रमक धोरण स्वीकारू आणि शिवसेनेने आपले धोरण बदलले नाही तर तिचा 'चक्काचूर' करण्यास पक्ष समर्थ आहे असेही सागण्यात आले. पक्षाच्या कचेरीवर आणि लेनीन जन्मशताब्दीच्या समारंभावर शिवसेनेने केलेले हल्ले भ्याडपणाचे होते. समोरासमोर लढण्याची शिवसेनेत हिंमत नव्हती असे पक्षाचे म्हणणे.

अगदी सुरुवातीपासून शिवसेनेला विरोध करणारा पक्ष म्हणजे कम्युनिस्टच. सुरुवातीला सर्व राजकीय पक्षांनी शिवसेनेशी लाडीगोडी करून पाहण्याचा प्रयत्न केला. पण आता बहुतेक विरोधी पक्ष शिवसेनेपासून दूर झाले आहेत हा आपल्याच धोरणाचा विजय होय असे कम्युनिस्ट पक्षाला वाटते. येत्या काही दिवसात ठिक-ठिकाणी सभा घेऊन शिवसेनाविरोधी वातावरणाला धार आणून लोकमत तयार करण्याचे पक्षाने ठरविले आहे.

कम्युनिस्ट पक्षाने खरोखरच हा कार्यक्रम अंमलात आणला तर मुंबईत मोठ्याच मारामाऱ्या होतील. कारण शिवसेनेचा पणच आहे मुबईत कम्युनिस्ट सभा होऊ द्यायच्या नाहीत. उधळून लावायच्या. पुण्यात तर म्हणे बाळासाहेब ठाकऱ्यांनी एका जाहीर सभेत भाषण करताना शिवसैनिकांना चक्क सांगितले, कम्युनिस्टांच्या सभेवर दगड फेकताना 'मोठे दगड निवडा आणि बरोबर नेम धरून फेका.' खरे खोटे कुणास ठाऊक. पण शिवसेना ही सध्या तरी जहाल कम्युनिस्ट विरोधी आहे आणि यापुढे मुंबईत शिवसेना आणि कम्युनिस्ट यांच्यातल्या मारामाऱ्या वाढतच जातील आणि डोकी फुटतील.

शिवसेनेचा हा तुफान कम्युनिस्ट-विरोध बघून मुंबईतील ‘ कॉस्मोपोलिटन ’ लोकांच्या सेनेविषयीच्या मतात फरक पडू लागला आहे असे दिसते. ‘ आफ्टर ऑल शिवसेना इज नॉट द्याट ब्याड ! ’ असे चक्क उद्‌गार आता लोकलमध्ये, क्लब्स्‌मध्ये आणि सिनेमा थिएटरातही सहज ऐकू येतात. आणखी कुणाला शिवसेनेच्या प्रेमाचा पान्हा येत्या काही दिवसात फुटतो ते लवकरच कळेल. शिवसेनेच्या कम्युनिस्ट विरोधामुळे हे एक मात्र साधले, की सेनेचा महाराष्ट्रीयेतर लोकांविषयींचा द्वेष कमी झाला. आणि मराठी कम्युनिस्ट व शिवसैनिक एकमेकांची डोकी परस्पर फोडताहेत हेही दृश्य अमहाराष्ट्रीयांना मुंबईत दिसायला लागले. हे बघून त्या लोकांना आनंदाच्या उकळ्या फुटताहेत किंवा काय हे मात्र सांगण्यासारखे नाही.

एक जुनी गोष्ट. तीनचार वर्षांपूर्वी शिवसेनेच्या डरकाळ्या नुकत्याच ऐकू येऊ लागल्या होत्या, तेव्हा मुंबईतला एक कॉम्रेड भेटला होता. तो म्हणाला होता, ‘ शिवसेनेकडे जाणारे जे सगळे तरुण आहेत ते खरे म्हणजे आमचेच. ते भाषा अगदी आमच्यासारखी बोलतात. आमच्याच सारखे पेटलेले. हे सारे बेकार तरुण, विफल विद्यार्थी हे आम्हा कम्युनिस्टांचे 'रॉ मटेरियल.' आज ते शिवसेनेकडे दिसताहेत कारण आमचे नेते त्यांची फिकीर करीत नाहीत. ते दिल्लीच्या आणि जगाच्या राजकारणात मश्गुल आहेत. या तरुणांना आकर्षक कार्यक्रम पाहिजेत आणि आकर्षक घोषणा पाहिजेत. 'दलितांच्या लढ्यासाठी तयार व्हा ’, किंवा ‘ साम्यवादी विजयासाठी कामगारांनो एकत्र या ’ अशा संदिग्ध घोषणांपेक्षा ‘ मराठी तरुणांनो एकत्र या, आपण नोकऱ्या मिळवू ’ ही घोषणा केव्हाही अधिक आकर्षक आणि फायदेशीर आहे. पण या तरुणांना या घोषणांमधील विफलता लवकरच कळून येईल आणि शेवटी हे सगळे तरुण येत्या तीन-चार वर्षात आमच्याकडे येतील—’ तो कॉम्रेड असेच काहीतरी बोलला. नेमके शब्द आठवत नाहीत. पण याच अर्थाचे. त्या गोष्टीला तीन-चार वर्षं झालीत. एवढ्यात मात्र त्या कॉम्रेडची गाठ पडली नाही.

— अरुण गोसावी


आणि हे बघ...लोणचे करतांना
बावरून जाऊं नकोस. सरळ ठाकूर यांचा
लोणच्याचा तयार मसाला वापरून
"ह्यांना" खुश कर



लोणची कमी श्रमांत, अल्प खर्चात
रुचकर, टिकाऊ व चवदार बनतात.

ठाकूर आणि मंडळी
माहीम, मुंबई-१६.





सु. ल. सोमण

# बहात्तरचे वेध

गेल्या काही महिन्यातले वारे पाहता, नजिकच्या काळात मुदतपूर्व निवडणुका होतील हा विचार मागे पडू लागल्याचे जाणवते. केंद्र सरकार हे अल्पमतातले सरकार आहे. महत्त्वाचे घटना–बदल घडवून आणण्यासाठी आवश्यक तेवढे बहुमतही त्या पक्षाजवळ नाही. आजचे केंद्रशासन, उजवे व काही प्रमाणात डावेही कम्युनिस्ट, प्रसोपा, मुस्लिम लिग, द्रमुक वगैरे निव्वळ फुटीर गटांवर अवलंबून आहे. हे सगळं खरं असलं तरी, मुदतपूर्व निवडणुका सध्यातरी कुणालाच नको आहेत. विशेषतः दोन्ही कांग्रेस गटांना तर त्या नकोच आहेत. गेल्या वर्षीच्या दुफळीनंतर, नवकांग्रेसने राष्ट्रियीकरण, समाजवाद वगैरेच्या आकर्षक घोषणा केल्या असल्या तरी, केवळ घोषणांच्या जोरावर निवडणुका जिंकून निर्विवाद बहुमत मिळवता येईल एवढी त्या पक्षाची तयारी नाही. उलट १९७२ पर्यंत निवडणुका लांबल्या, तर आपसातल्या दुफळ्या सांधून संघटना बांधायला त्यांना अवधी मिळाला तर हवा आहे आणि म्हणूनच महत्त्वाचे प्रश्न न रेटताच शक्यतो कुणाला न दुखवता खुर्ची सांभाळता आली तर पहावं एवढाच इंदिरा कांग्रेसचा सध्या प्रयत्न आहे. डाव्या पक्षांनी हा कच्चा दुवा ओळखला आहे. त्यातून जेवढं पदरी पाडून घेता येईल तेवढं घ्यावं, व शक्यतो साऱ्या यंत्रणा खिळखिळ्या करून केंद्र दुर्बल बनवावं हा त्यांचा प्रयत्न. अर्थात त्यांनाही निवडणुका नको आहेत. जुन्या कांग्रेसला अलीकडील पोटनिवडणुकांतून जे हादरे बसले आहेत, त्यावरून त्यांनाही निवडणुका हव्या असतीलसं वाटत नाही. त्यांच्या नेत्यांच्या घोषणा काहीही असोत.

अर्थात ह्या पार्श्वभूमीवर सर्वांचे लक्ष बहात्तरवर केंद्रित झालं असल्यास नवल नाही. बहुतेक राजकीय पक्षांच्या परिषदा, त्यांच्या पुढाऱ्यांची भाषणं ह्यात 'बहात्तर' निश्चितच असते. आज हे लक्ष अधिक केंद्रित होणंही साहजिकच आहे. कारण खऱ्या अर्थानं आज कुठल्याही पक्षाला 'अखिल भारतीय' नामाभिधान लावता येणार नाही. म्हैसूर, गुजरात, तामिळनाडू, ओरिसा ह्या ठिकाणी नव्या

[ पृष्ठ ६२ वर ]



ग्यानबा

## □ कर्जात खरोखर जग जगते !

यावत् जीवेत् सुखं जीवेत् । ऋणं कृत्वा घृतं पिबेत् ।
भस्मीभूतस्य देहस्य । पुनरागमनं कुतः ?

हा नरदेह एकदा लाभतो. मंत्रिपद एकदाच लाभते. नरदेह काय किंवा मंत्रिपद काय, टिकते किती दिवस हे देखील सांगता येत नाही. अशा परिस्थितीत जाईल तो दिवस सुखाचा कसा जाईल याचीच काळजी केली पाहिजे. कर्ज काढून देखील तूप खाल्ले पाहिजे. ही समजायला साधी गोष्ट पुष्कळांना कळत नाही. नुकतीच लोकसभेत कुणीतरी अशी मूर्ख सूचना केली, की इंदिरा सरकार जे झपाट्याने कर्जबाजारी होत चालले आहे, त्यावर काहीतरी कायदेशीर मर्यादा घालावी. कर्ज काढण्याच्या सरकारी क्षमतेवर मर्यादा अशा करता घालावी की पुढच्या पिढ्या चालू राज्यकर्त्यांना शिव्याशाप देणार नाहीत. त्याचे पुतळे, त्यांच्या नावाची उद्याने पुढली पिढी उध्वस्त करणार नाही. अशा तऱ्हेने मर्यादा घालण्याचा अधिकार लोकसभेला आहे. या मूर्ख सूचनेचा अर्थखात्याचे इंदिरा-सहाय्यक रघुनाथ-राव खाडिलकर यांनी चांगला समाचार घेतला. ते म्हणाले – 'घटनेने दिलेला अधिकार लोकसभेने वापरलाच पाहिजे असे काही बंधन नाही. आमचे आता-पर्यंतचे कर्ज फक्त १२३६८ कोटी रुपये आहे ! आम्ही वाट्टेल तेवढे कर्ज काढू – बंधन घालण्याची मुळीच आवश्यकता नाही '

गप्प बसले ! वापरू शकू अशा पुष्कळ गोष्टी आपल्याकडे असतात. जोडे, डोके-बुद्धी. परंतु ही वापरलीच पाहिजेत असे बंधन काय म्हणून ? आपली लोकसंख्या ५० कोटी आहे. म्हणजे आज प्रत्येक भारतीयाच्या डोक्यावर फक्त २५० रुपये कर्ज आहे. माणशी अडीचशे रुपये कर्ज फार झाले काय ? आमच्या ओळखीच्या काही लोकांना तर चार-चार पाच-पाच हजार कर्ज आहे. आम्ही म्हणतो की १२०००००००००० कोटी रुपये कर्ज झाले तरी काही बिघडत नाही. उत्तम कारभार करायचा म्हणजे कित्तीतरी पैसा लागतो. कृष्णकांत नावाच्या सभासदाने मागे राज्यसभेत विचारले–

'मंत्रिगणंग लहान लहान घरातून राहिले म्हणून काय बिघडणार आहे ?'

इंदिराजींनी त्याला असा चापला. इंदिराजी म्हणाल्या–' या काय माकडचेष्टा Grimmicry लावल्या आहेत ! इतर देशात मंत्री फक्त कचेऱ्यात कामे करतात.

आपल्या देशात मंत्र्यांची घरे ही 'श्रमकुटिरे' झालेली आहेत. तहान नाही, भूक नाही. अहोरात्र मत्री काम करीत असतो. त्याला लहान घरात राहृला सागता? त्याची कार्यक्षमता मग टिकेल कशी?'

कृष्णकाताचा चेहरा पेद्यासारखा झाला नि काय! मंत्री जे सांगतात त्याप्रमाणे काम करणारी कारकून मंडळी एकेका खोलीत शंभर शभर कोंबली तर कार्यक्षमता कमी होण्याचा प्रश्न नाही. लोकांना रहायला घरे नसली तरी त्यांचा उत्साह टिकून रहातो असा अनुभव आहे. नाहीतर चाळीचाळीतून पोरांची खिल्लारे दिसली असती काय? मत्र्याची घरे प्रासादतुल्यच हवीत. लहान घराचे छिद्र चटकन दिसते. या मोठमोठ्या मंत्री मंडळीची गृहछिद्रे लोकांना दिसून कसे बरे चालेल?

मंत्री वाढत आहेत. आता नुकतेच इंदिराकाँग्रेसचे जिवलग मित्र चरणसिंग यांचे मंत्रिमडळ वाढले. २२ मत्री आणि १८ उपमत्री एकदम जन्माला आले. पूर्वी अर्थ-खाते, विक्रीकर आणि नोंदणी या सर्वांचे एक खाते होते. चरणसिगानी अर्थखाते, विक्रीकर आणि नोंदणी यांना तीन मंत्री नेमून टाकले. बेनीसिग हे उद्योगमंत्री होते. लगेच बेनीसिगाकडून साखर उद्योग काढून घेऊन एक नवा साखर-उद्योग-मंत्री त्यांनी नेमला. शेतकी आणि पशुसंवर्धन ..एकच मंत्री करीत होता. पशुसंवर्धन वेगळे केले. इमारत-दळण-वळण याची तीन खाती झाली. इमारत खाते, दळण खाते, वळण खाते. खाती झाली आणि मत्री खात्यात आले, तेव्हा त्याच्या लक्षात आले की दळणखाते चालू शकेल, परंतु वळण खाते म्हणजे काय बुवा? कुणी कुणाला वळण लावायचे. घोटाळा लक्षात येताच खाते रद्द करण्यात आले. आता या रिकाम्या मंत्र्याला पशुसंवर्धनातून बैल वेगळे काढून बैलसवर्धन खाते देण्यात यावयाचे आहे असे कळते. प्रत्येक पशु वेगळा केला तर एकेक 'पशुपति' सहज मंत्रिमंडळात राहू शकेल.

तात्पर्य मंत्री वाढतात. कामे वाढतात. घरे अधिकाधिक मोठी झाल्याशिवाय गत्यतर नाही! केद्र सरकारच्या एकेका मंत्र्याला कर वजा जाता रु. ८०,००० वर्षाला मिळतात. सामान्य माणसाला जर वर्षाला एवढे रुपये मिळवायचे असले, तर प्रत्यक्षात त्याला ४ लाख रुपये मिळवावे लागतात — म्हणजे सर्व कर दिल्या-नतर त्याला रु. ८०,०००|— उरतात. मत्री हा केवढा प्रचंड पुरुष आहे याची यावरून कल्पना येईल. लाखमोलाची ही माणसे!

प्रासादासारखी घरे, अमेरिकन मोटारी हे सगळे हवे, म्हणजे कर्ज काढल्या-शिवाय भागेल काय? खाडिलकरानी देशासाठी वाट्टेल तेवढे कर्ज करावे. मूर्ख विरोधकाकडे त्यांनी लक्ष देऊ नये. इदिराजी त्याच्या पाठीशी आहेत. मरणातून जगण्याचे कारण नाही. कर्जात जगणेच खरे आहे.

सर्वस्वाची 'घाण' आधी करी। सर्वस्वची ये स्वये तुझ्या घरी।
कितिही मागुनि जे मिळते। कर्जात खरोखर जग जगते॥

¤ ¤ ¤

विजय तेंडुलकर


# एका खलपुरुषाचा अंत

सायंकाळ.

अक्षरशः। हजारोंच्या गर्दीने वल्लभभाई पटेल स्टेडियम तुडुंब भरलेले असायचे. एकाचे भले प्रचंड मधाचे मोहोळ गुणगुणून उठावे तसे स्टेडियम निनादत असायचे. उत्सुकता शिगोशिग भरून ओसंडत असायची. टाळ्या, ओरडा, शिट्ट्या...

किंवा ते भले प्रचंड स्टेडियम इथे तिथे तुरळकच भरून बाकी नुसतेच ओकेबोके पडलेले असायचे. एकाद्या अर्धनिद्रित अजगरासारखे ते कुठे कुठे क्षीण हालचाल करीत असायचे. उजळलेल्या दिव्यांच्या उजेडात त्याचे न भरलेले भाग भयाण वाटायचे.

यातले काहीही असल तरी घंटेचा आवाज होताच तो मधोमध उंच बांधलेल्या चौकोनी रिंगणात दोरखंडामधली फट रुंद करून सफाईने प्रवेश करी. बिनकेसांचे लहान डोके, नक्षीदार सैल रंगीत झबल्यातून उठणारी लोंबती केसाळ छाती, भले गरगरीत पोट, भक्कम बाहू, निमुळते तरी वरचे चारशे पौंडांचे वजन लीलया पेलणारे जरा आखुड विजारीतले घट्ट पाय आणि या साऱ्याचा विचार करून कोणी चिकटवावी तशी हनुवटीशी एक आखुड काळी दाढी. चौकोनी, बेढब



त्यांचं खरं नाव एमिल छाया

वाटणारा एकूण बांधा. मनात एक प्रकारची घृणा जागी करणारे रिंगणातले अनाकर्षक व्यक्तिमत्त्व.

तो रिंगणात येताच प्रेक्षकातून हमखास कुत्सित आवाज आणि उद्गार निघत. तारस्वरात अपशब्द उठत. कसली कसली टरफले, साली, क्वचित फाटकी वहाण नाहीतर जोडादेखील रिंगणाच्या दिशेने फेकला जाई.

तो जणू हा आपला सत्कारच होतो आहे अशा पद्धतीने प्रेक्षकांना उद्देशून एक हात वर करीत रिंगणभर थोडा फिरे. मग अंगातले काढून उघडा होई. लांबून आणखीच बेढब, उतरला, फोपश्या वाटे. मग तुमान कसून घेई. शरीराचे लालबुंद जडसर बोचके रिंगणात वेगवेगळ्या पद्धतींनी हलवून, ताणून आणि आपटून त्याला एक घट्टपणा आणी. दरम्यान ' माइक 'वरून घोषणा चाललेली असे, लाल बत्तीके बाजू है दुनियाका सबसे बडा मशहूर पहिलवान...और हरे बत्तीके बाजू...

त्यानंतर रिंगणात पंच शिरे. दोन्ही पहिलवानांना कुस्तीचे नियम समजावण्याचा ठरीव विधी उरकला जाई, जवळ काही गुप्त शस्त्र वा वस्तू त्यांनी लपवून तर आणलेली नाही, त्यांची नखे वाढलेली तर नाहीत, याची औपचारिक तपासणी पंचातर्फे होई आणि कुस्तीतल्या दोघा प्रतिस्पर्ध्यांची हातमिळवणी आणि सलामी झडे.

हे चालू असतानाही हा सतत चिडचिडलेला, तिरसट वाटे. पंच आणि प्रेक्षकां-विषयीची त्याची नफरत क्षणोक्षणी व्यक्त होई. प्रतिस्पर्ध्याशी त्याचे वागणे आरंभापासून दर्पाचे आणि मनस्वी तुच्छतेचे असे. हावभावानी तो त्याला एकसारखा धमकावीत असे. त्याच्या अंगावर चालून गेल्यासारखे करी. याचे हे वागणे आणि याचे उतरल्या पपयासारखे वाटणारे शरीर यांनी प्रेक्षकाला याच्याविषयी तिरस्कार न वाटता तरच नवल होते. तुलनेने याच्याविरुद्ध खेळणारे पहेलवान याच्यासमोर कसेही असले तरी उमदे, सरळ आणि बाधेसूदच वाटत. ते लोकप्रिय होत. हा मात्र कायम त्या रिंगणातला खलपुरुष असे. अनेक उमद्या पहिलवानांना हा लोळवी आणि प्रेक्षक याच्यावर तेवढा अधिक राग करीत. याचा डाव सदा रडीचा. खेळ अनेक नियमबाह्य सवयींनी भरलेला. पुन्हा वर याचा कांगावखोरपणा. अनेक पहिलवानाना असल्या खेळाने रिंगणात जाया करीत, रिंगणाबाहेर फेकीत किंवा गुणावर हरवीत हा कुस्त्याच्या चढत्या मोसमात अखेर एकाद्या अतिशय लोकप्रिय जेत्या पहिलवानाशी कुस्ती लढण्याची शीग गाठावयाचा. स्टेडियमवर तुफान गर्दी लोटावयाची. टॅक्सी ड्रायव्हर्स, हॉटेलातले नोकर, वेश्या, मजूर, हमाल, झुंडीनी स्टेडियमवर धावावयाचे, उत्सुकतेने पाढरपेशे तर चूषखातर भारी तिकिटात उच्चवर्गीय याव याचे. मुंगी फिरकण्याला जागा रहात नसे. स्टेडियम गच्च भरे. तिकिटे न मिळाल्याने बाहेर दंगे होत. कडेकोट पोलिस बदोबस्त ठेवला जाई. मंत्री येत. पुढारी येत. फिल्मी स्टार्स येत.

आणि होणाऱ्या कुस्तीत हा आपल्या नियमबाह्य खेळाची कमाल दाखवून पहिल्या फेऱ्या जिंकून घेई. लोकप्रिय 'हीरो' हरत असे. वर्मी मार खात असे. प्रेक्षकाचा पारा फेरीगणिक चढू लागावयाचा. ओरडा वाढ लागावयाचा. आणि बघता बघता पारडे उलटे फिरत असे. 'हीरो' वरचढ होऊ लागे. हा मार खाऊ लागे, उचलला जाई, हापटला जाई, तंगडी-तोड डावाचा तात्पुरता बळी झालेला दिसे, याच्या पाठीपोटावर प्रतिस्पर्धी नाचे. वेदनेने हा चित्कार करी तसे प्रेक्षक हर्षभरित होत. बेढब जाडया देहाची वळकटी होऊन प्रतिस्पर्ध्याने अडकवलेल्या पेचात हा 'नो, नो' डरकाळत धडपडे, तडफडे, रिंगणाच्या भुईवर मुठी आपटून वेदना हलक्या करी तेव्हा प्रेक्षक गुदगुल्या होऊन किंचाळत, मारो, मारो सालेको. छोडो मत ! हा पेचातून सुटला की उभे स्टेडियम एका आक्रोशात हळहळे. हा गुंतला की एकच थरार साऱ्या स्टेडियममधून जणू धावत जाई. हा नियमभंग करून नियमभगाच्या खोट्या तक्रारी पचाकडे करी, वाद घाली, पंचावर धावून जाई तेव्हा साऱ्या स्टेडियममध्ये हजारो मुठी उगारल्या जात. चाकूदेखील बाहेर पडत. हा प्रेक्षकांना उद्देशून रिंगणात थुंकत असे, हातवारे करी तेव्हा साऱ्या स्टेडियममधल्या तमाम प्रेक्षकाला जणू ते त्याच्या पुरुषार्थाला आव्हान वाटे. आणि अखेर त्या लोकप्रिय पहेलवानाहातून हा हरला की रावण, नरकासुरादि मानवतेच्या

उभ्या इतिहासातील दुष्ट खलपुरुषांचे पारिपत्य झाल्याच्या खुषीत स्टेडियमवरचे हजारो प्रेक्षक दहा दहा मिनिटे तारस्वरात एकच जल्लोष करीत तो पार वरळीच्या लोटस सिनेमापर्यंत ऐकू जात असे. सडकेने जाणारे म्हणत साला किंगकाँग हारा होगा.

जय आपलाच आहे असे या जल्लोषात रिंगण न सोडता वारंवार जाहीर करणाऱ्या आणि पंचाला, प्रतिस्पर्ध्याला, प्रेक्षकांना, साऱ्या जगाला शिव्याशाप देणाऱ्या याच्यात जणू जो तो आपले पराजय पाही. आपल्या अवहेलना ज्याला त्याला इथे समूर्त दिसत, आणि या पराजयावर, अवहेलनेवर जो तो एकदा थुंकून घेई. एक गलिच्छ शिवी देऊन घेई, अखेर हा रिंगण सोडून नाइलाजाने प्रेक्षकांमधल्या वाटेने जाई तेव्हा निर्भर्त्सनेचा गजर होई. चौफेर छी: थू: घडे. याच्यावर केळ्यांच्या साली, फाटक्या वहाणा येऊन पडत, वेश्या याला फिदीफिदी हसत. हरला तरी दर्पाचे पोकळ फूत्कार टाकीत हा पॅव्हिलियनमध्ये अदृश्य होई आणि दुनियेतल्या तमाम खलपुरुषांचा बुद्दू, असंस्कृत, किळसवाणा प्रतिनिधी किंगकाँग अंतर्धान होई असे. पॅव्हिलियनमध्ये शिरे तो एक गंभीर प्रकृती प्रौढ इसम. आता जवळून तो बुद्धिमान दिसे. त्याच्या अंगप्रत्यंगात रग आणि ताकद जाणवे. त्याचे डोळे विलक्षण सावध आणि चलाख वाटत. त्याच्या भव्य भाळावर, जिवणीत विचारी आणि सुसंस्कृत वळण भासत असे. कुस्तीचा पोषाख उतरल्यावर त्याने जणू एक आभास उतरवला असे वाटे. वेगळ्या शर्ट पँट असल्या पोषाखात तो निराळाच होई. उगीच कमी जाड, कमी बेढब वाटू लागे. तो मोठाड देहाचा संवेदनाक्षम आणि सभ्य माणूस भासत असे, अंतर्बाह्य सभ्य, सौम्य. आकार आणि कीर्ती सोडल्यास चारचौघांशी नाते सांगणारा. चारचौघांप्रमाणेच एक बरेवाईट आयुष्य जगणारा, जगू मागणारा. हसणारा, अंतर्मुख होणारा, तुमचे आमचेच अन्न तुमच्या-आमच्याइतकेच खाणारा, (प्रसिद्धी मात्र सात कोंबड्या, चौवीस अंडी इ०) मधुमेहासारख्या विकाराने पोखरला जाणारा आणि तरी पोटाचा धंदा म्हणून कर्तुमकर्तुम मदोन्मत्त म्हणून आठवड्यातून दोनचारदा रिंगणात मनसोक्त तमाशा करणारा.

कुस्ती हे त्याचे नाटक असे. या नाटकात तो भूमिका करी. हे नाटक तुफान रंगले तरच त्याला बरी प्राप्ती असे. रंगतीसाठी एक कामिक, एक व्हिलन फ्रीस्टाइल कुस्त्यांच्या रंगमंचावरही लागतात. हा एका वेळी दोन्ही होई. आपली भूमिका त्याने विचारपूर्वक, परिश्रमपूर्वक बसवली होती. त्यात त्याची कधीही कसूर नसे. या भूमिकेचे एक वेगळे व्यक्तिमत्त्व त्याने कल्पिले होते, आपल्या व्यक्तिमत्त्वासाठी एखाद्या चपखल पोषाखाप्रमाणे हे व्यक्तिमत्त्व त्याने बेतले होते. हे दुसरे व्यक्तिमत्त्व पहेनून तो रिंगणाकडे चालत जाई तेव्हा वेगळा होई. मग परतेपर्यंत हे ढळत नसे की सुटत नसे. त्याला बिलगून राही. प्रेक्षकांना हेच खरे वाटे कारण त्यांना हेच हवे असे – शिव्याशाप आणि जोडे वाहण्यासाठी एक समूर्त, किळसवाणा दुष्टावा, हलकटपणा, रडीचा डाव.

सर्कसमधल्या विदूषकाची अशीच दोन व्यक्तिमत्त्वे असतात. एक अनाकर्षक,

रुक्ष, गद्य, खरे. दुसरे तुफान हास्यकारक आणि सर्वांना हवेसे वाटणारे. नटाला दोन व्यक्तिमत्त्वे असतात. नेत्यांना असतात. कलावंताना असतात. सर्कसऐवजी फ्रीस्टाइल कुस्तीचे रिंगण पत्करणाऱ्यानाही ती असतात. एक लोकप्रिय, दुसरे खरे. हा कुस्तीच्या रिंगणात विदूषक होऊन आपल्या बेढब उघड्या बाष्पाचे प्रदर्शन करी. नट होऊन एक असंस्कृत आणि दुष्ट भूमिका वठवी, नेत्याप्रमाणे लोकरंजन आणि लोकक्षोभ या दोन तारांवर लीलया वावरत राही; कलावंतालाही अभ्यसनीय वाटेल असा अस्सलाचा यशस्वी थरारक भास नकली वेदना, नकली क्रोध, नकलीच हिंसा यातून निर्माण करून गर्दीला घटका-घटका, दिवस—दिवस, महिने न् महिने झुलवत ठेवू शके. तिच्याशी यातून त्याने द्वेषाचे, तिरस्काराचे घट्ट, दाट, अतुट असे नातेच बांधले होते आणि या नात्याच्या जोरावर फ्रीस्टाइल कुस्त्यांच्या मैदानावर तो पैसा देणारा एक धंदा यशस्वीपणे करीत होता. त्याला नावाने आणि प्रत्यक्ष ओळखत नाही असे कोणी या महानगरात नव्हते. अक्षरशः घरोघर त्याचे नाव होते.

फ्रीस्टाइल कुस्त्यांचा बहर सपला आणि किंगकाँग, दारा सिनेमात घुसले. किंगकाँग तिथे रमला नाही. रिंगणात एका अंतरावरून अतिशय खरी वाटणारी त्याची बुद्दू, बेढब, महाकाय क्रूरकर्म्याची हातखंडा भूमिका कॅमेऱ्यापुढे तेवढी टिकली नाही. उलट दाराचा बांधेसूद तगडा देह आणि उमदा रांगडा चेहरा कॅमेऱ्याला तेव्हाच पटला.

किंगकाँग ही मुंबईपुरती एक दंतकथा उरली. ओक्याबोक्या वल्लभभाई पटेल स्टेडियमकडून जाताना ही न चुकता स्मरत असे. ते फ्रीस्टाइल कुस्त्या नामक रंगतदार, दणकेबाज, क्षणोक्षणी श्वास अडविणाऱ्या नाटकाचे दिवस...ती किंचाळली, हेलावती, मुठी वळवळून रिंगणाकडे धावत किंगकाँगचे रक्त मागती प्रेक्षकांची गर्दी...ते रिंगणातले चीत्कार, हुंकार...दहा दहा रुपयांची तिकिटे काढून पुढे मोक्याच्या जागा अडवून बसणारे ते हमाल, हॉटेल-पोऱ्ये, टॅक्सीवाले... त्यांच्या तोंडच्या दारूचा आणि मारो, खतम करोचा अति उग्र दर्प...आणि रिंगणात लढतीच्या फेऱ्याच्या अध्येमध्ये, रिंगणाकडेस, दोरखंडावर रेलून दुखावलेला हातपाय एकीकडे सीधा करीत जमलेल्या गर्दीचा नजरेने अंदाज घेत सुखावणारा किंगकाँग नावाचा हंगेरी देशाचा, देशोधडी लागून कुस्त्या खेळत फिरणारा, धंदेवाईक नरराक्षस — हंगेरीत केव्हातरी एका पत्नीचा पती, मुलाचा पिता असलेला. दोहोंचीही राजकीय उठावात कत्तल झाली.

नुकतीच एक छोटी बातमी वृत्तपत्रात मागील पानावर प्रसिद्ध झाली. सिंगापूर नजीक एका भयंकर मोटार अपघातात किंगकाँग ठार झाला. त्याच्या हाडाचा चक्काचूर होऊन गेला. याच बातमीत वयही होते. जेमतेम पन्नास. आणि खरे नाव एमिल झाया.

◻ ◻ ◻



समीर

## ▫ केंट विश्वविद्यालयातील घटनेच्या निमित्ताने

अमेरिकन कॉलेज-विद्यार्थ्यांनी देशभर उसळविलेल्या प्रखर युद्धविरोधाच्या लाटेत ज्या विश्वविद्यालयातले चार विद्यार्थी नुकतेच गोळीबारात मृत्युमुखी पडले त्या केंट (ओहायो) विश्वविद्यालयाचे मानसशास्त्राचे प्राध्यापक ड्वाइट आर्नोल्ड नुकतेच भारत-भेट देऊन गेले. त्या हत्याकांडाचे व तदनुषंगाने सांप्रतच्या मानवी संस्कृतीचे विश्लेषण करताना ते म्हणाले :

क्रूरपणे गोळीबार करणाऱ्या नॅशनल गार्ड शस्त्रधाऱ्यांनी त्यांना जे शिकविण्यात आले होते तेच केले. एखादा समरप्रसंग निर्माण झाला की तो गोळ्या चालवून व लोकांना ठार मारून सोडवायचा असे त्यांना शिकविण्यात येते व त्यांनी ती शिकवण अमलात आणली. या दृष्टीने पाहता त्यांच्यात व जगातल्या कुठल्याही देशाच्या सैनिकात फरक नाही. सामाजिक मानसशास्त्राच्या नियमानुसार एका विशिष्ट संस्कृतीत एक विशिष्ट प्रकारचा आचार मान्यता पावलेला असतो. सध्या जगातले देश दुसऱ्या देशांना धमकावण्यासाठी किंवा नष्ट करण्यासाठी दरवर्षी १५००० कोटी डॉलर खर्च करीत आहेत, कारण देशादेशांतल्या समस्या सोड-विण्याचा हाच एक मार्ग आहे अशी त्यांची समजूत आहे. हिंसा हाच आजच्या संस्कृतीचा आत्मा आहे, म्हणन केंट विश्वविद्यालयात जे घडले त्याला सर्व जगाची संस्कृती जबाबदार धरली पाहिजे, कारण या संस्कृतीत अशा आचरणाला वाव आणि मान्यता मिळते. सर्व जगातल्या सुव्यवस्था-रक्षकांना दंगे काबूत आणण्याच्या अहिंसक उपायांचे पुरेसे शिक्षण देणे अत्यंत महत्त्वाचे आहे. असे उपाय शोधून काढण्यासाठीं व त्याप्रमाणे पोलिसांना शिक्षण देण्यासाठी जो काही पैसा खर्चावा लागेल व प्रयत्न करावा लागेल तो सत्कारणी लागला असे समजावे लागेल.

'आपली संस्कृती सोडून भारतात व पूर्वेला येईपर्यंत एक गोष्ट माझ्या कधीही लक्षात आली नाही ती सांगावीशी वाटते. गेल्या शंभर वर्षांत दोन जागतिक युद्धे झाली व त्यात पाच कोटी माणसे मेली. पण हे अशिया, आफ्रिका किंवा दक्षिण अमेरिकेत घडले नाही, तर अत्यंत सुशिक्षित, तांत्रिक दृष्टया प्रगत व तथाकथित

ख्रिश्चन देशात घडले.' अमेरिकेत निक्सनच्या व्हिएटनाम-विषयक व अतर्गत धोरणामुळे जनतेत इतकी गंभीर फूट पडली आहे की, 'क्रांतीची अथवा यादवीची शक्यता आहे. पण काही चिन्हे आशादायक आहेत. त्यातले एक म्हणजे निक्सनच्या मंत्रिमंडळातच त्याला विरोध होत आहे. ही घटना अभूतपूर्व म्हणावी लागेल. दुसरे म्हणजे कॉंग्रेसमध्ये शांततावादी सभासद निवडून आणण्याची चळवळ वाढत आहे.

## ◻ प्रौढ साक्षरतेची कानडियन कल्पना

कानडातील टोरोंटो विश्वविद्यालयाचे प्रौढ शिक्षणाचे प्राध्यापक जेम्स ड्रेपर नुकतेच एका आतरराष्ट्रीय प्रौढ साक्षरता शिक्षण-वर्गासाठी दिल्लीला आले होते. तेव्हा त्यानी साक्षरतेची भारतीय कल्पना व कानडियन कल्पना यात किती तफावत आहे याची ओझरती कल्पना दिली :

प्रौढ साक्षरता-प्रसाराचे कार्य करणाऱ्या मडळीना विशेष शिक्षण देण्याची आवश्यकता असते, कारण प्रौढ व्यक्तीला अथवा वर्गाला शिकविण्यासाठी विशेष कौशल्याची व तंत्राची जरुरी असते. सध्या ज्ञानात व विज्ञानात प्रचंड भर पडत चालली असल्याने सर्व जनतेला शिक्षणाची सधी प्राप्त करून देणे विशेष अगत्याचे झाले आहे. प्रौढ शिक्षणाची कानडियन कल्पना भारताप्रमाणे केवळ साक्षरतेपुरती मर्यादित नाही. तिच्यात प्रौढ व्यक्तीच्या सतत शिक्षणाचाही अंतर्भाव होतो. मुलांपेक्षा प्रौढांना शिकविणे अधिक कठीण आहे काय? 'प्रौढांना शिकविणे अधिक सोपे असते, कारण त्यांच्या बाबतीत शिस्तीचा किंवा अभ्यासाकडे त्याचे लक्ष ओढण्याचा प्रश्न उद्भवत नाही. प्रौढ विद्यार्थी फार मन लावून शिकतात. माझे काही विद्यार्थी फक्त शाळा शिकलेले आहेत, पण ते एम्. ए. किंवा पी. एच्. डी. झालेल्या मंडळीसारखे काम करू शकतात. शिवाय मी शिक्षक आहे तसाच विद्यार्थीही आहे याची मला सतत जाणीव राहते. कारण माझे विद्यार्थी परिपक्व विचाराचे असून त्यांनी जीवनाच्या निरनिराळ्या क्षेत्रात बऱ्याच वर्षांचा अनुभव घेतलेला आहे.

कानडात प्रौढ साक्षरतेची बरीच मोठी समस्या आहे. कानडाच्या लोकसंख्येपैकी सुमारे एकतृतीयांश लोक 'व्यवहारी' दृष्ट्या निरक्षर आहेत. आणि ही मडळी नुकतीच परदेशातून आलेली नसून दोन-तीन पिढ्या कानडात स्थायिक झालेली आहेत. अर्थात् 'व्यवहारी निरक्षरते'ची आमची कल्पना भारतीय कल्पनेपेक्षा वेगळी आहे. आम्ही आठवीपर्यंत शिकलेल्या माणसाला व्यवहारी दृष्ट्या निरक्षर समजतो. कारण कानडासारख्या वैज्ञानिक दृष्ट्या अत्यंत प्रगत समाजात त्याला तेवढे शिक्षण पुरत नाही, उलट भारतात एवढे शिकलेला माणूस चांगलाच सुशिक्षित समजला जाईल.'

◻ ◻ ◻

## विज्ञानेश्वरी

दत्तप्रसाद दाभोळकर

# विज्ञानाची ' तलाश '

एका अत्यंत गाजलेल्या मुंबईच्या एका खून खटल्यात प्रत्यक्ष साक्षीदारांपेक्षा एका तंत्रज्ञाची साक्ष अतिशय महत्त्वाची मानण्याचे आपण वृत्तपत्रांत वाचले असेल. न्यायदानाच्या या पवित्र कार्यात विज्ञानाची साक्ष खरोखरच अतिशय महत्त्वाची ठरते. कारण विज्ञानाचे मूलभूत सिद्धांत व तत्त्वे कायद्याप्रमाणेच व्यक्ति-निरपेक्ष असतात. आणि म्हणूनच विज्ञानाच्या ' तलाश 'ची मदत आजकाल अमेरिकेतील ' फेडरल ब्युरो ऑफ इन्व्हेस्टिगेशन ' (एफ. बी. आय.) नेहमी घेत असते.

२४ फेब्रुवारी १९६८ ला अमेरिकेतील ओहिओ शहराचा एक भाग बाँबच्या एका प्रचंड स्फोटाने हादरला. सॅम्युअल हॅमसन या रहिवाशाचे या स्फोटात तुकडे तुकडे झाले. प्राथमिक चौकशीत पोलिसांना दोन गोष्टी समजल्या. पोस्टाने आलेले एक पार्सल उघडत असताना सॅम्युअलला हा अपघात झाला होता. दुसरी गोष्ट म्हणजे, सॅम्युअल हा एक ' रंगिला ' सरदार होता. कॅलिफोर्नियातील एका युवतीच्या प्रेमात हा विवाहित माणूस सापडलेला होता. याच युवतीचे कॅलिफोर्नियातील बँक अधिकारी आल्बर्ट रीची यांच्याशी देखील ' प्रकरण ' होते. थोडक्यात प्रेमाच्या या त्रिकोणात आल्बर्ट हा सॅम्युअलचा प्रतिस्पर्धी होता. – पण याशिवाय कोणताही पुरावा आल्बर्ट विरुद्ध उभा करता येत नव्हता. या वेळी ' एफ. बी. आय 'च्या लोकांनी हे प्रकरण हातात घेतले. स्फोटात सापडलेल्या बाँबच्या प्रत्येक तुकड्याची त्यांनी कसून तपासणी केली. त्याचे लक्षावधी फोटो त्यांनी घेतले. त्यानंतर अशाच स्वरूपाचे अनेक बाँब तयार करून त्यांनी ते उडवून पाहिले ! ' एफ बी. आय 'च्या लक्षात एक गोष्ट आली होती. बाँब खोक्यात भरताना एक पकड (प्लायर) वापरावी लागते. स्फोटानंतर वातीजवळच्या तुकड्यावर पकडीचे ठसे तसेच न पुसता राहिलेले असतात. त्यानंतरचे काम सोपे होते. आल्बर्टच्या घरातील सर्व मामुली हत्यारे त्यांनी जप्त केली. त्याच्या घरातील एका पकडीवरचे ठसे वातीजवळच्या बाँबच्या तुकड्याशी मिळते जुळते होते. खटला सुरू असतानाच आल्ब

टेने आत्महत्या केली. बोटांच्या ठशानी नव्हे तर हत्याराच्या ठशांनी 'विज्ञानाने गुन्हेगार पकडला होता.

विज्ञानाने असेच काम अॅडॉल्फ कूर्सच्या खुनी माणसाला फासावर चढविताना केले. अॅडॉल्फ या श्रीमंत उद्योगपतीला पळवून त्याचा खून केल्याचा आरोप जोसेफ कॉरबेटवर होता. पण जोसेफ कॉरबेटची मोटार खुनाच्या ठिकाणापासून दोन हजार मैलावर चिखलात रुतून गज़त पडली होती. खुनाच्या ठिकाणापासून इतक्या दूर अंतरावर आरोपीची मोटार मिळाल्याने संशयाचा फायदा त्याला मिळणार होता. पण वैज्ञानिकांनी अॅडॉल्फच्या खुनाच्या वेळी जोसेफ कॉरबेटची मोटार खुनाच्या ठिकाणीच होती हे सिद्ध केले. या शास्त्रज्ञांनी कॉरबेटच्या मोटारच्या मागील बाजूला लागलेल्या वाळलेल्या चिखलाचे संशोधन केले. चारशे एकवीस प्रकारच्या मातीच्या वेगवेगळ्या नमुन्यांतून मोटारीला लागलेली माती आणि खुनाच्या जागेतील माती एकाच प्रकारची असल्याचे त्यांनी सिद्ध केले. — रक्ताची वर्गवारी करून नव्हे, तर मातीची वर्गवारी करून विज्ञानाने गुन्हेगाराला फासावर चढविले.

'एफ. बी. आय'च्या फक्त वॉशिंग्टनमधील प्रयोगशाळेत शंभराहून अधिक शास्त्रज्ञ काम करीत असतात. परिक्षानळी, सूक्ष्मदर्शक यंत्र, प्रकाशपट असल्या साध्या साधनांच्या साहाय्याने ते गुन्हेगाराचा शोध घेतात. — विज्ञानाच्या या 'तलाश'-साठी खरोखरच कोट्यावधी रुपये खर्च होतात! आणि या 'तलाश'वर खर्च होणारे हे कोट्यावधी रुपये एक सुरक्षित समाज निर्माण करण्यात यशस्वी ठरतात.

## गंज चढतो डोळ्यावर....

आपण सारेच जण डोळ्याला झापड लावल्यासारखे हिंडत असतो. चाकोरी बाहेरच्या साध्या साध्या गोष्टी आपल्या लक्षात येत नाहीत. यंत्रयुगात यंत्र चाल-विणाऱ्या आणि निर्माण करणाऱ्या मानवाचा मेंदू खरे पाहता अधिकाधिक तल्लख बनला पाहिजे. पण होत काय, त्या ऐवजी मानवी मेंदूच एक यंत्र बनतो! — 'एक्स्पो ७०' या साध्या गाजत असलेल्या प्रदर्शनात या संदर्भात नुकताच एक मजेशीर परिसंवाद झाला. जे अत्यंत साधे शोध लावता येतील, जे शोध लावल्यामुळे मानवी श्रमांची व पैशाची बचत होईल अशा काही शोधांच्यावर त्या वेळी चर्चा झाली. इतक्या गोष्टी यापूर्वीच आपल्या लक्षात कशा आल्या नाहीत याचे अनेक शास्त्रज्ञांना त्या वेळी आश्चर्य वाटले!

'गुड टायर' कंपनीच्या शास्त्रज्ञानी एक नवा प्रयोग पुढे मांडला. मोटारीने प्रवास करताना अनेकदा मोटारचे चाक सपाट होते. यामुळे मोटरने प्रवास

[पृष्ठ ५४ वर]

# सासवडची तथाकथित क्रांती

**रतनलाल भंडारी**

आपल्या सर्वच सामाजिक आणि राजकीय जीवनात ' क्रांती ' हा शब्द भलताच सवंग झाला आहे. या शब्दाचा वापर इतक्या क्षुल्लक आणि किरकोळ बाबींसाठी होत असतो की त्यातली भव्यता, समाजपरिवर्तन हे अर्थ आता आपण हरवून बसलो आहोत. काही दिवसापूर्वी ' महाराष्ट्र टाइम्स् ' वगैरे वृत्तपत्रांतून अशाच एका क्रांतीची महाराष्ट्रात वाटचाल सुरू असल्याचे मधून मधून घोषित करण्यात आले. मी स्वतः या विभागात वाढलेला असल्यामुळे, काही काळ राजकीय व सामाजिक कार्य करीत असल्यामुळे या ' क्रांती 'च्या ' कळा ' मी पाहिल्या आहेत. त्याबद्दल अधूनमधून केसरी, माणूसमध्ये लिहिलेही आहे. या तथाकथित क्रांतीची साथ एखाद्या जळूसारखी आपले समाजजीवन भ्रष्ट करीत असल्यामुळे पुन्हा एकदा हा विषय लोकांसमोर मांडणे मी माझे कर्तव्य समजतो.

या क्रांतीला ' सासवडची क्रांती ' असे संबोधले गेले. बारामती, हवेली, पुरंदर आणि दौंडच्या काही भागांत–विशेषतः जिरायत म्हणून ओळखल्या जाणाऱ्या भागात- हिचा फैलाव आहे. पुरंदर तालुक्यात या योजनेने हातपाय पसरल्यानतर त्याची मोठी प्रसिद्धी वृत्तपत्रांनी केली. त्यामुळे या क्रांतीला सासवडचे लेबल चिकटले एवढेच. या प्रसिद्धीला मोहून आता इतर काँग्रेस आमदारांनीही या योजनेची राबणूक आपल्या भागात करण्यास सुरुवात केली आहे. अर्थात त्याला पुणे जिल्हा परिषदेचा आशीर्वाद आणि साहाय्य आहेच.

पी. एल्. ४८० च्या करारातील एका कलमाच्या अनुषगाने या योजना सुरू आहेत. पूर्वी ही मोफत येणारी मदत, (गहू, मरा, पीठ, तेल इ.) शासनातर्फे दुष्काळी कामावर काम करणाऱ्या मजुरांना मदत म्हणून वाटण्यात येत असे. या येणाऱ्या धान्याची मुबईपासूनची वहातुक भारतीय रेल्वे मोफत करीत असते. हे वाटप लायन्स क्लबतर्फेही होत असे. एखाद्या चर्चची कोणीतरी मावशीबाई जाऊन

वाटत असे. त्यांचा 'नियमीत रतीब' असा ठरलेला नसे.

दोन तीन वर्षापूर्वी या गव्हाच्या मोबदल्यात मजुरांकडून काम करून घ्यावे ही कल्पना बारामतीचे मामलेदार श्री. पाटील याच्या डोक्यात आली व त्यांनी आमदार शरद पवार यांच्या सल्ल्याने तांदुळवाडी येथे प्रयोगादाखल पहिले काम सुरू केले. मग पंचायत समितीच्या मदतीने या योजना तालुक्यात अनेक ठिकाणी सुरू करण्यात आल्या. यापूर्वी हे प्रयोग नगर जिल्ह्यात काही ठिकाणी केले होते. परंतु त्याला इतकी प्रसिद्धी व शासकीय मान्यता मिळालेली नव्हती. आता सुरू असलेल्या योजनासाठी गहू पुरविणाऱ्या सस्थांची एक भारतीय सघटना तयार करण्यात आली असून तिचे नांव 'ख्रिश्चन असोसिएशन फॉर सोशल ॲक्शन' असे ठेवण्यात आले आहे. पूर्वी अमेरिकेतून गहू पाठविणाऱ्या निरनिराळया एजन्सीज् होत्या. त्या यात एकत्रित येऊन या कामांना पुरवठा करतात. त्यांची एक तालुक्याची कमेटी, ठराविक मडळीना एकत्रित करून, काम सुरू झाल्यानंतर सुमारे एक वर्षाने तयार करण्यात आली. पुढे या योजनेसाठी जिल्हा परिषदेने एक ओव्हरसियर व दोन तंत्रज्ञ दिले. नंतर एस्टीमेटस् करण्यात यावीत याबद्दल थोडासा आग्रहही धरण्यात येऊ लागला. अर्थात एस्टीमेटस् संस्थेला मान्य होतील अशा रीतीने कार्यकर्ते करवून घेतात. प्रारंभी कामाची मुदत ठरविण्यात येते, परंतु नंतर कामाची मुदत हवी त्याप्रमाणे वाढविण्यात येते. बहुतेक सर्वच योजनांची मुदत आतापर्यंत वाढविण्यात आली आहे. प्लॅन्स कार्यकर्त्यांना फारसे पहावयास मिळालेले नाहीत.

या योजनाना महाराष्ट्र शासनातील एका गटाचा एवढा मोठा पाठिंबा लाभला आहे की मुख्यमत्री वसतराव नाईक यानी बारामती येथील एका भाषणात 'सर्वच महाराष्ट्रातील आमदारांनी शरद पवाराचे अनुकरण करून मिशनऱ्याच्या कुब-ड्याच्या आधारे महाराष्ट्र घडवावा' असे आवाहनही केले होते. याच भाषणात त्यांनी शासनामार्फत अशा योजना अमलात आणणे पैशाभावी अशक्य असल्यामुळे हा मार्ग चोखाळण्यास हरकत नाही, असे जाहीरपणे सागितले होते.

या योजनातील अनेक योग्य अयोग्य योजनापैकी पंचवीस पाझर तलावांची कामे पूर्ण करण्यात आली आहेत असा या योजनेच्या प्रवक्त्यांचा दावा आहे.

वास्तविक या पचवीस बधाऱ्यापैकी तीन ते चार पाझर तलाव हे 'तलाव' या सदरात मोडण्यासारखे आहेत. बाकीच्या तलावाचे स्वरूप तळईसारखे अथवा शेताला घालण्यात येणाऱ्या मोठ्या बंधाऱ्यांसारखे आहे. त्यातील तीन-चार तलाव कामातील दोषामुळे व अतिवृष्टीमुळे फुटले आहेत. पंचायत समितीमार्फत होणारे तांत्रिक मार्गदर्शन अगदीच मामुली स्वरूपाचे असते बधाऱ्यांवर रोलिंग करताना योग्य तेवढे पाणी वापरण्यात येत नाही. सुपे-खोपवाडी तलावाचे उदाहरण घ्याव-याचे झाल्यास या तलावातील बाजूची बगल आधी भरून न घेता प्रवाहाचा जोर ज्या मध्यभागात एकत्रित होतो तेथेच काम करण्यात आल्यामुळे दिनाक १२-५-७०

च्या पावसाने ते वाहून गेले. त्या दिवशी सकाळीच मी ते काम पाहिले होते व येत्या पावसाळघात ते वाहून जाईल असा इशाराही तेथील कार्यकर्त्यांना दिलेला होता.

या योजनांची भलावण करणारा एक सचित्र लेख महाराष्ट्र टाइम्समध्ये श्री. गोविंद तळवलकर यांनी लिहिला. त्या त्यांच्या लेखातील अनेक विधाने चुकीच्या माहितीवर आधारीत आहेत. एवढेच काय पण मुख्यमंत्र्याचा वटाणे येथील तलावावरचा म्हणून जो फोटो छापण्यात आला आहे तो त्या स्थळाचा नाही. मुख्यमंत्र्यांनी अद्याप या तलावावर कधीही पायधूळ झाडलेली नाही. तसेच १९६६ साली बारामती तालुका दुष्काळ निवारण समितीने पाझर तलावाची आखणी करण्यासाठी जे सर्वपक्षीय प्रयत्न केले त्याचा साधा उल्लेखही लेखात नाही. आज 'कासा' मार्फत ज्या तलावांची कामे झाली आहेत त्यांची आखणी व मांडणी या समितीने तेव्हाच केलेली होती. विरोधकांनी केलेल्या प्रयत्नांची नोंद सुदैवाने शासनाच्या दप्तरी आजही आहे.

आमदार शरद पवाराचे समवेत जी समिती या कामावर देखरेख करते ती विशिष्ट गटाची असल्यामुळे याच तालुक्यातील पवार विरोधी गटाने कासा योजनेसाठी खास जिल्हा परिषदेने नेमलेल्या इंजिनियरला तेथून सोमेश्वर साखर कारखान्यात दाखल करून घेतले. आता हा गट काही योजना आखून परदेशी संस्थाच्या मदतीने कासाचीच अथवा कासासारखीच जुनी जारू नव्या बाटलीतून दुष्काळी विभागाला पाजण्यासाठी प्रयत्नशील आहे.

आज गेले दोन महिने या तलावावर काम करणाऱ्या लोकाना धान्यरूपाने कसलीच मजुरी मिळालेली नाही. कारण 'भिकेचा मामला आणि हळूहळू बोंबला.' परंतु यामुळे मजुराची संख्या एक चतुर्थांशदेखील राहिलेली नाही.

या योजनेवर विरोधक काय आक्षेप घेतात ते सागताना श्री. तळवलकर म्हणतात, "कासा सस्थेचा कोणीही अधिकारी कामावर देखरेख ठेवीत नाही.' नियंत्रण ठेवीत नाही. कोणीही ख्रिश्चन झालेले नाही. अशा स्थितीत धर्मांतराचा बागुलबोवा दाखविणे किंवा शरद पवार वगैरेंनी ख्रिश्चन संस्थेपुढे लोटांगण घातल्याची टीका करणे गैरलागू आहे." तळवलकराचे हे विधान विरोधकांना न्याय देणारे नाही कोणीही धर्मांतर होईल ही भीती व्यक्त केलेली नाही. आज विसाव्या शतकात या भागात असे घडेल हे फारसे संभवनीय नाही. प्रश्न धर्म बदलण्याचा नसून नकळत इमान बदलण्याचा असतो. या सस्थेच्या एक ख्रिश्चन कार्यकर्त्या कु. वासर यानी स्वत:च मला बारामती येथे सागितले (दि. १५-५-७०) की," मी आणि शिंदे मास्तर (एक ख्रिश्चन गुरुजी) हे वाटपाचे काम पहातो. त्याचप्रमाणे मिस क्यूज या योजनेवर देखरेख करतात."

तेव्हा धर्मांतराचा व देखरेखीबद्दलचा बालीश आरोप बाजूला ठेऊन या योजने-

वर करण्यात येणाऱ्या दोन प्रमुख आरोपांचे स्वरूप जनतेने समजून घेतले पाहिजे. हे आरोप अर्थातच जाहीरपणे केले गेले. ते असे : १. या योजनेत मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार चालतो. २. या योजनेमुळे ग्रामीण भागातील जनता ही अधिक लाचार आणि निष्क्रिय होते. अशा पद्धतीने मदत करणाऱ्या परकीय संस्थांचा हाच मुख्य उद्देश असतो.

पहिला आरोप सिद्ध करण्यासाठी फार मोठ्या पुराव्यांची आवश्यकता नाही. भ्रष्टाचार हा आपल्या सर्वच जीवनाचा अविभाज्य भाग होत चालला आहे. परंतु वैयक्तिक स्वार्थ साधण्यावरोबर ' बहुजन हिताय... ' म्हणून ज्या भ्रष्टाचाराकडे डोळेझाक केली जाते तो अधिक घातक आहे. त्यांची काही उदाहरणे--

या पूर्वी पंचायत समिमीमार्फत या कामावर देखरेख करणाऱ्या एका ओव्हर-सियरने दोन तीन पाझर तलावावरच्या खोट्या हजेऱ्यांची पत्रके जप्त करून काम बंद केले होते. म्हणून त्याची तावडतोब बदली करण्यात आली.

तलावांची कामे अनेक वर्षे खोटी ' स्केअरसिटी ' दाखवून रेंगाळत चालू ठेवा-वयाची व त्या मुदतीत यातूनच गावातली इतर कामे या गव्हावर उरकून घ्याव-याची. मजुरी म्हणून गहू वाटावयाचा व रक्कम लोकवर्गणीत अथवा एखाद्या बड्या धेंडाच्या खिशात जावयाची. माझ्या माहितीच्या एका तलावावरील काम सुमारे अडीच वर्षे अखंड चाललेले असून या मुदतीत दोन शाळा व एक विहीर बांधण्यात आली आहे. खुद्द माझ्या गावी, एका बैठकीत आमदार व मी स्वत: हजर असताना, त्यांनी गावातील पुणे जिल्हा शिक्षण मंडळाच्या शाहू हायस्कूलच्या सुपे येथील इमारतींसाठी तीन हजार रुपये रोख भरल्यास, तावडतोब गव्हाच्या तलावांचे काम सुरू करू असे सांगितले. आणि विकासाच्या स्पृहेने सुपे येथील सरपंचांनी आपल्या वाडीतर्फे दोन दिवसात तेवढी रक्कम रोख भरली. अद्याप हे तलावांचे काम सुरू झालेले नाही.



या योजनेवरील दुसरा आरोप अधिक मूलगामी आहे. केंद्रीय राज्यमंत्री आण्णासाहेब शिंदे यांनी आपल्या पणजी येथील मुलाखतीत निष्क्रियतेचा व लाचारीचा हा आरोप मान्य केला होता. तो करण्यापूर्वी एकदा बारामती तालुक्यातील काही पाझर तलावांच्या योजना त्यानी पाहिलेल्याही होत्या. या मुलाखतीचे पुढील वृत्त पहा– "परकीय मिशनऱ्यांच्या अशा मदतीमुळे गोव्यातील व इतर भागातील गरीब लोक अधिकाधिक निष्क्रिय बनतात हे मान्य करून श्री. शिंदे म्हणाले, परकीय मिशनऱ्यांकडून अशा प्रकारची दिली जाणारी मदत ही आक्षेपार्ह वाटत असून या प्रश्नांचा विचार अधिकाऱ्याची एक समिती गंभीरपणे करीत आहे. परकीय देशाच्या सांस्कृतिक केंद्र बंदीच्या केंद्र सरकारच्या निर्णयानतर अन्नधान्य वाटपबंदीची आवश्यकता निर्माण झाली आहे." (३–३–७०) केसरी.

या निष्क्रियतेचे स्वरूप कसे आहे हे पहाण्यासाठी फार मोठे गणित घालण्याची जरुरी नाही. या ऐतखाऊपणावर टीका होऊ लागल्यावर गव्हाच्या मजुरीचे व कामाचे परिमाण कासाने ठरविले. एक ब्रास काम केल्यानंतर मजुरी म्हणून साधारणत: २० ते २४ पौंड गहू देण्यात येतो त्याचे साधारणत: नऊ साडेनऊ किलो होतात. या गव्हाची किंमत साडेसहा रुपयापेक्षा कमी होत नाही. तेल निराळे मिळते. इतक्याच कामाला सरकारी बडिंगवर दूरवरची वहातुक असली तरी तीन रुपयापेक्षा जास्त पैसे मिळत नाहीत. याचा अर्थ निष्क्रियता वाढविणे होत नाही काय? थोडावेळ सामाजिक परिणामांचा विचार बाजूला ठेवला तरी कोणत्या एस्टीमेटस्‌मध्ये ही कामे पूर्ण होत असतील याचा निर्णय जनतेनेच घ्यावा.

पूर्वी जेव्हा हा गहू फुकट वाटला जात असे तेव्हा तो आपण दुष्काळात, आपत्तीत, भीक म्हणून खात आहोत याची जनतेला जाणीव होती. त्याच भिकेला आता प्रतिष्ठा प्राप्त होत आहे. आपण आता भीक अथवा उपकार खात नसून अल्प श्रमाच्या मोबदल्यात हा आता हक्क असल्याची भावना निर्माण झाली आहे. ग्रामीण भागाच्या विकासाची जबाबदारी ज्या शासनावर आहे, पंचायत समित्या आणि जिल्हा परिषदा याच्यावर आहे त्या लोकसत्ताक सस्थांची जरुरी तरी काय आहे? आज 'कासा' हे करते उद्या सोमेश्वर साखर कारखान्याने त्याऐवजी दुसरी एखादी असलीच योजना उभी केली तर? का मागे एकदा अशोक मेहतानी मत्री असताना भीक मागताना भारतमातेचे जे चित्र अमेरिकेत रेखाटले होते तेच जगात कायम करावयाचे आहे? या संदर्भात चीनमधल्या १९३५ च्या भयानक दुष्काळात जेव्हा मोओ–त्से–तुंगकडे परकीय मिशनरी आपल्या मदतीच्या थैल्या घेऊन गेले तेव्हा त्याने दिलेले उत्तर आठवते. माओने सांगितले होते, 'तुमची ही भीक खाऊन ही जनता जगली तरी ती मेल्यासारखीच आहे.' पण असे उत्तर देणाऱ्या माओला सामर्थ्यशाली चीन उभा करावयाचा होता. आम्हाला आमचे राष्ट्र कसे उभे करावयाचे आहे हाच खरा सवाल आहे. □ □ □



# पराजित-अपराजित

वि. स. वाळिंबे

निसर्ग त्यावेळी पॅरिसवर बेहद्द खूष होता.

आधीच ही नगरी देखणेपणासाठी साऱ्या जगभर प्रसिद्ध. ' या नगरीत एक रात्र काढली की रणक्षेत्रावरचा सारा शिणवटा दूर होतो ' असे नेपोलियनने म्हटले आहे ते उगाच नाही. प्रशस्त रस्त्यांलगतची नयनवेधक उपवने, त्या उपवनांशी लडिवाळ खेळ खेळणारी कारंजी आणि या रमणीय पार्श्वभूमीवर उभे असलेले लहान मोठे पुतळे म्हणजे फ्रेंच नागरिकांच्या लाडक्या 'पारी'ची शान आहे. आर्क द ट्रायंफपासून प्लेस द ला कोन्कोर्दपर्यंत लहानसा फेरफटका मारला तरी पॅरिसच्या देखणेपणाचा शाही दिमाख नजरेत भरतो.

एकोणीसशे चाळीसचा मे उजाडला तेव्हा तर या नगरीवर वसंत-वैभवाची अक्षरशः उधळण झालेली होती. या वैभवाचा दरवर्षी सुखद अनुभव घेणारे पॅरिसमधले नागरिकही म्हणत होते, ' गेल्या कित्येक वर्षांमध्ये इतकी बहार पहायला मिळाली नव्हती.'

आणि त्यांचे म्हणणे अक्षरशः खरे होते.

त्यावर्षी नेहमीपेक्षा थंडीचा कडाकाही वाढला होता. हा गारठा टिकलाही होता बराच काळ. त्यामुळे पॅरिसच्या चैतन्यावर काहीशी मरगळ पसरली होती. अशा परिस्थितीत पॅरिसने ऋतुराजाच्या आगमनाला दाद द्यावी, त्याचे स्वागत करताना या नगरीने आनंदाने मोहरून जावे हे स्वाभाविक होते.

आधीच फ्रेंच नागरिक निसर्गवेडा. त्यातच ऋतुराजाची मेहरबानी झालेली. मग त्याने चिंताची सारी जळमटे झटकून टाकून विहाराला बाहेर पडावे यात नवल नाही. यावेळीही तसेच घडले होते. पॅरिसमधली उद्याने आणि उपवने स्त्री–पुरुषांनी फुलून गेली होती. बाहेरच्या जगात काही विपरित घडते आहे याचे कोणालाच भान उरले नव्हते.

स्वप्ननगरी हे आपले अभिधान पॅरिसने सार्थ केले होते. अनेक अंगांनी खुणविणारा निसर्ग आणि आपण या व्यतिरिक्त या स्वप्ननगरीला कशाचीही शुद्ध उरली नव्हती.

त्यामुळे सैराट सुटलेल्या उन्मत्त महत्त्वाकांक्षेच्या पदाघातांनी युरोपची भूमी भयभीत

---

## फ्रान्सचा गेल्या शंभर वर्षांतील राजकीय इतिहासाचा आलेख

## एक

---

झालेली आहे इकडे कोणाचेच लक्ष नव्हते. भोवताली भडकलेल्या आगीच्या ज्वाळा आपल्यापर्यंत येऊन भिडणार नाही असेच प्रत्येकजण आपल्या मनाला समजावत होता.

केवळ नागरिकच नव्हे तर नेतेसुद्धा.

प्रधानमंत्री रेनों याना फ्ल्यूने जर्जर केले होते आणि त्यामुळ निरनिराळ्या ठिकाणच्या राजदूताकडून येणारे गुप्त खलिते त्याच्या टेबलावर तसेच पडून राहिले होते. कोणी त्यांना महत्त्वाच्या कामासाठी भेटायला आले तरी त्यांची अप्रबुद्ध सह-चारिणी त्याला पिटाळून लावत होती. पेतासारखा एकेकाळात गाजलेला सेनानी आपल्या राजकीय भवितव्याचे अंदाज बांधण्यात गर्क झालेला होता. संरक्षणमंत्री दलादिए आणि सरसेनानी गामेलिन यांचे रेनों यांच्याशी बिनसले होते. आपल्याला बडतर्फ करण्याचा रेनों यांचा विचार आहे याचा त्या दोघांना सुगावा लागला होता. त्यामुळे तेही बेफिकिर बनले होते. जनरल गोमेलिन आणि जनरल जार्ज या सहकाऱ्याचे संबंधही विस्कटले होते. त्यांचे आपापसात डाव–प्रतिडावाचे राजकारण सुरू झाले होते. ते पाहून त्यावेळी पॅरिसमध्ये हजर असलेला एक ब्रिटिश सेनानी

म्हणाला की, हे दोघे फ्रेंच सेनानी आपापसातील भांडणात इतके दग झाले होते की जर्मनीशी आपल्याला मुकाबला करायचा आहे याचा त्यांना विसर पडला होता.

वरिष्ठ नेत्यांची ही वृत्ती सगळीकडे झिरपत गेली होती आणि त्यामुळे शासन-यत्रणेचा कणाच निखळून पडला होता. लष्करातले लहान-मोठे अधिकारी आणि सैनिकही असेच शिथिल झाले होते.

आपल्या देशाची ही केविलवाणी स्थिती पाहून एका व्यक्तीचा जीव तडफडत होता. ती आपल्या परीने धडपडत होती. परंतु कर्नलसारख्या मामुली हुद्यावर असलेल्या त्या व्यक्तीच्या आक्रोशाकडे लक्ष द्यायला कोणीच तयार नव्हते. त्या व्यक्तीचे नाव चार्लस द गॉल.

सारा फ्रान्स बधीर झालेला आहे हे माहीत असूनही द गॉल यांना स्वस्थ बसवत नव्हते. ते त्यांच्या स्वभावातच नव्हते. त्यामुळे इतर सारे मार्ग खुंटले तेव्हा द गॉल यांनी तीन मे रोजी खुद्द प्रधानमंत्री रेनॉ यांनाच पत्र लिहिले.

त्या पत्रात त्यांनी म्हटले होते–' स्वयचलित वाहने उपलब्ध झाल्याशिवाय लष्कराला काहीही करता येत नाही हे पोलड आणि नॉर्वे येथल्या लढायांवरून दिसून आलेले आहे. या आधुनिक युद्धतंत्राकडे आतापर्यंत फ्रान्सचे साफ दुर्लक्ष झालेले आहे. नवनव्या शोधामुळे युद्धाच्या तयारीसंबंधीच्या कल्पनेत आता खूप बदल झालेले आहेत. त्याची दखल घ्यायची असेल तर आपल्याला लष्करी साहित्याची आमूलाग्र फेररचना करायला हवी. फ्रान्सला तातडीने जर काही करायचे असेल तर ते हे. पण हा निर्णय लष्करी अधिकारी करू शकत नाहीत. ते सरकारचेच कर्तव्य आहे. राज्यक्रातीच्या वेळी कार्नोसारखे समर्थ नेतृत्व सैन्याला लाभले होते. फ्रान्सला आज आणखी एक कार्नो हवा आहे. मला वाटते ती गरज भागवायला आपण खचितच पात्र आहात.'

मध्यतरी रेनॉ यानी पोलडमधल्या आघाडीला भेट दिलेली होती. तेव्हापासून आपली सध्याची लष्करी तयारी अपुरी आहे हे त्यानाही जाणवू लागले होते. परतु त्याबाबत लवकर पावले उचलायला हवीत असे काही त्याना वाटले नाही. शिवाय ते हा विचार बोलून दाखवू लागले की लष्करी नेते त्याचे म्हणणे उडवून लावीत असत. तरीही तो विचार त्याना अस्वस्थ करीत असे. परंतु सेनानीची समजूत कशी घालायची हा खरा प्रश्न होता. म्हणून त्यांनी सर्व वरिष्ठ सेनानीना पत्र लिहून कळविले–' ज्या कल्पना वा विचार आपल्या मनात पक्के झालेले असतात ते माणसाला सहजासहजी झटकून देता येत नाहीत हे खरे असलें तरी मला असे वाटते की युद्धतत्र बदलले आहे याची दखल आपण घेतलीच पाहिजे. म्हणून नव्या पद्धतीची नवी शस्त्रास्त्रे आपल्या सैनिकाना वापरायला यावीत यासाठी नव्या सेनानीची गरज आहे. कारण ही शस्त्रे कशी आणि केव्हा वापरायची हे त्यांना अनुभवाने माहित झालेले आहे. हे आपण सर्वांनी लक्षात घेतले तर या युद्धाची जबाबदारी नव्या पिढीतल्या सेनानीकडे सोपविली पाहिजे हे सहज पटू शकेल.'

रेनॉं याचा हा सल्ला वृद्ध सेनानीना मानवला नाही. पहिल्या महायुद्धाच्या काळात आपण जे काही शिकलो आहोत ते या दुसऱ्या महायुद्धाच्या काळातही पुरेसे आहे असेच ते मानीत होते. लष्करी कचेरीमध्ये एखाद्या तरुण अधिकाऱ्याने नव्या युद्धतन्त्राचा उल्लेख केला की हे सेनानी त्यांची कुचेष्टा करीत असत. काळ शहाणपण शिकवतो हे त्यांच्या गावीही नव्हते.

म्हणजे युद्धाचे काळेकभिन्न ढग आपल्या देशाच्या रोखाने येऊ लागल्यावरही फ्रेंच सरकार निवांत होते आणि लष्करी नेते निश्चिंत होते. त्याना जाग आणण्याचे प्रयत्न अजिबात होत नव्हते असे नाही. पण अशा प्रयत्नाना दाद न देण्याइतके फ्रेंच नेतृत्वाचे मन निबर झालेले होते.

याचे एक उदाहरण सागण्यासारखे आहे.

मार्चच्या प्रारंभी फ्रेंच लोकसभेच्या संरक्षणविषयक समितीने सेडानला भेट देऊन तेथल्या संरक्षणव्यवस्थेची पाहणी केली. बेल्जम आणि फ्रान्स यांच्या सीमेवर असलेल्या या महत्त्वाच्या ठाण्याभोवतालची आपली सरक्षण–व्यवस्था अगदीच तुटपुंजी आहे हे पाहून या समितीला आश्चर्य वाटले. सेडानहून परत येताच तिने आपला अहवाल लिहून काढला आणि तो सरकारकडे धाडला. त्यात असे स्पष्ट म्हटले होते की, 'सेडान येथले मोर्चे उभारण्याचे काम थंडीमुळे नव्हे तर तेथल्या लष्करी अधिकाऱ्यामधील मतभेदामुळे रेंगाळत चालले आहे. आर्दानेसचे जंगल आणि म्यूस नदी या नैसर्गिक तटबंदीमुळे येथे उगाच जादा तयारी करण्याची गरज नाही असे काही अधिकाऱ्याना वाटते. मोर्चे उभारण्याचे काम इतक्या मंदगतीने चालू आहे की अद्याप बऱ्याच ठिकाणी सिमेंटदेखील ओतले गेलेले नाही. सेडान येथली आजची स्थिती अशी आहे की आपण शत्रूस एक तासभरदेखील रोखू शकणार नाही. त्यामुळे जर्मन सैन्य तेथून आत घुसले तर आपले काय होईल याची कल्पना करवत नाही. परतु अजूनही वेळ गेलेली नाही. आपण तातडी केली तर सेडान येथील मोर्चे पक्के करणे सहज शक्य आहे.'

सरक्षण–समितीचा हा अहवाल जेव्हा सेडान–आघाडीचा प्रमुख जनरल हटझिगर याच्या हातात पडला तेव्हा पहिल्याने तो मोठ्यादा हसला आणि तसाच तो टेबलाच्या खणात ठेवून दिला. या अहवालाबाबत वरिष्ठाकडून विचारणा झाली तेव्हा हटझिगरने कुत्सित उत्तर धाडले. त्याने कळविले–'या लोकप्रतिनिधीना जरा अगोदर इकडे पाठवून द्यायला हवे होते, म्हणजे त्यांच्या ज्ञानाचा आम्हाला भरपूर फायदा घेता आला असता. असो. झाले ते झाले. शत्रूला रोखण्याइतकी आमची तयारी पूर्ण झाली आहे याची खात्री बाळगा.'

या हटझिगरची मिजास लवकरच उतरली. इतकी की फ्रेंच सरकार पॅरिसहून परागंदा होऊन व्हिशीला गेले तेव्हा युद्धमंत्रीपदापर्यंत बढती मिळालेल्या या घमेंडखोर सेनानीला आपले ते पत्र नष्ट करून टाकण्याचा हुकूम काढावा लागला.

संबंधित अधिकाऱ्याने तो मानला नाही म्हणूनच हंटझिगरच्या अकलेचा पुरावा पुढे उपलब्ध होऊ शकला.

वयोवृद्ध सेनानी आपले ऐकत नाहीत याचा अनुभव आल्यामुळे हतबल झालेल्या रेनॉ यांना द गॉल यांच्या पत्राने धीर आला. चार मे रोजी त्याच्या हातात ते पत्र पडले तेव्हा त्यांनी प्रथम काय ठरविले असेल तर ते जनरल गामेलिन याना बडतर्फ करायचे.

एक आठवड्याच्या विश्रांतीमुळे रेनॉ यांची प्रकृती आता थोडीशी सुधारली होती आणि त्यामुळे ते 'के दोर्से' या आपल्या सरकारी निवासस्थानी परतले होते. तेथे येताच प्रथम त्यानी आपल्या लष्करी सल्लागारास बोलवून घेऊन त्याच्यापुढे द गॉल यांचे पत्र ठेवले. ते पत्र वाचल्यानतर लष्करी सल्लागाराने रेनॉ यांना विचारले. 'तुम्ही काय करायच ठरविलं आहे?'

'गामेलिन याच्या हातून कोणकोणत्या गफलती झाल्या आहेत याची यादी करा. पाहिजे तर मदतीला आणखी दोन सचिव घ्या.'

गामेलिन यांच्याविरुद्धचे आरोपपत्र तिघा जबाबदार अधिकाऱ्यांनी तयार केले तर या नालायक सेनानीच्या बडतर्फीला मत्रिमडळाची संमती मिळविणे सोपे जाईल हे ध्यानात घेऊनच रेनॉ यांनी लष्करी सल्लागाराच्या मदतीला आणखी दोन सचिव दिले.

लष्करी सल्लागाराने चार दिवसांनी आपला अहवाल रेनॉ यांच्या स्वाधीन केला. तो पाहून रेनॉ खूष झाले. तरीही तो अहवाल अपुरा आहे हे त्यांच्या ध्यानात आले. त्यामुळे त्यांनी आणखी काही माहितीची त्यात भर घातली. त्यानंतर त्यांनी सगळ्या मंत्र्याना निरोप धाडला –' उद्या नऊ मे रोजी सकाळी साडेदहा वाजता एका महत्त्वाच्या प्रश्नाचा विचार करण्याकरिता मंत्रिमंडळाची बैठक बोलाविण्यात


## पांढऱ्या डागांवर मोफत इलाज

पाढऱ्या डागांवरील औषधाचा महत्त्वपूर्ण शोध. अनेक वर्षांच्या कठोर प्रयत्नांनंतर आम्ही अनेक आडाखे बाधून पाढऱ्या डागांवरील औषधे तयार करण्यात यशस्वी झालो आहोत. एकदा औषध घेतल्यावर आपणांस त्याच्या गुणांची खात्री पटेल. ह्यापासुन हजारो लोकानी लाभ घेतलेला आहे, आजही बरेचजण याचा लाभ घेत आहेत. प्रचारार्थ औषधाची एक बाटली नमुना म्हणून दिली जाते. पांढऱ्या डागांपासून मुक्त झाल्यावर आपल्यासारख्याच या रोगाने पछाडलेल्या रोग्याना औषध घेऊन रोगापासून मुक्त होण्यासाठी अवश्य सांगा.

वेस्टर्न इंडिया कं. (बी. एन.) पो. कतरीसराय (गया)

आलेली आहे. आपण अवश्य हजर रहावे.'

दुसऱ्या दिवशी सकाळी नऊ वाजता रेनॉ आपल्या घरातून बाहेर पडले, परंतु तडक कार्यालयाकडे जाण्याऐवजी त्यांनी आपली गाडी एलिसे प्रासादाकडे वळविली. गामेलिन याच्याबाबतचा निर्णय अनेक दृष्टीनी महत्त्वाचा असल्यामुळे तो राष्ट्राध्यक्ष लेब्रन याच्या कानांवर घालणे त्यांना आवश्यक वाटले.

नऊ वाजून वीस मिनिटांनी राष्ट्राध्यक्ष लेब्रन आणि प्रधानमंत्री रेनॉ यांची चर्चा सुरू झाली. रेनॉ यांनी आपला विचार बोलून दाखविताच लेब्रन यांना आश्चर्याचा धक्का बसला.

ते म्हणाले, 'गामेलिन यांना दूर करण्याचा निर्णय संरक्षणमंत्री दलादिए यांना मान्य होणार नाही. तुम्ही फारच आग्रह धरला तर 'गामेलिन यांच्याबरोबर मीही जातो' अशी ते धमकी देतील. जर्मन आक्रमणाच संकट दाराशी आलेलं असताना ही अशी फूट पडणं फार घातक ठरेल याचा नीट विचार करा.'

खरे म्हणजे, रेनॉ यांच्या निर्णयापेक्षा सीमेपलीकडची परिस्थिती कितीतरी गंभीर झाली होती. परंतु लेब्रन यांच्यासारख्या भावनाविवश माणसाला दलादिए काय म्हणतील, काय करतील याचीच काळजी वाटत होती. परिस्थिती किती आटोक्याबाहेर गेलेली आहे याची खुद्द रेनॉ यांनादेखील नीट कल्पना नव्हती.

फ्रेंच राष्ट्रनेत्याच्या अंदाजापेक्षा प्रत्यक्षात घटना कितीतरी अधिक वेगाने घडत होत्या.

बेल्जम आणि हॉलंड यांच्यावरील आक्रमणाचा पाच मे हा मुहूर्त हिटलरने एक मे रोजीच निश्चित केला होता. ही बातमी एका नाझी-विरोधी जर्मन व्यक्तीकडून, बर्लिनमधल्या डच प्रतिनिधीला कळताच त्याने ती आपल्या सरकारला कळविली. जर्मन आक्रमणाचे संकट आपल्याप्रमाणे बेल्जमवरही येणार आहे हे कळताच डच


सुज्ञ लोकांची आगाऊ तरतूद

आगामी पावसाळ्यासाठी

स्त्रिया व पुरुषांकरिता विविध प्रकारच्या सर्वोत्कृष्ट छत्र्या
मार्केट भावाने मिळण्याचे एकमेव विश्वसनीय ठिकाण.

**एन्. व्ही. गोखले**

*टोप्या, होजिअरी व अद्ययावत तयार कपड्यांचे व्यापारी*

**प्रार्थना समाजजवळ, गिरगाव, मुंबई ४.**

सरकारने बेल्जियम सरकारला जागे केले. परतु दोन दिवसानी बर्लिनमधल्या बेल्जियम वकिलातीकडून जेव्हा तोच इशारा आला तेव्हा कोठे बेल्जियम सरकारचा त्या बातमीवर विश्वास बसला. आपल्या तटस्थतेचा हिटलरकडून अवमान होणार नाही अशी तोपर्यंत बेल्जमला खात्री वाटत होती.

हवा खराब असल्यामुळे आक्रमणाचा बेत एक दिवसाने पुढे ढकलावा असे जर्मन सेनानीनी ठरविले. अर्थात हिटलरला ही गोष्ट मुळीच आवडली नाही. त्यास पश्चिम आघाडी उघडण्याची अनिवार घाई झालेली होती. हिटलरच्या बेताला युद्धखात्याप्रमाणेच परराष्ट्रखात्याचाही विरोध होता. हॉलंड आणि बेल्जम याच्याकडून तटस्थतेचा भंग झाल्याचे जोपर्यंत आपल्याला सिद्ध करता येत नाही तोपर्यंत हे पाऊल उचलू नये असे परराष्ट्रखात्याने सुचविताच हिटलर भडकला.

तो म्हणाला, 'या दोन चिमुरड्या राष्ट्रांनी तटस्थतेचा करार पाळला आहे की नाही याची शहानिशा करण्याची आपल्याला काय गरज पडली आहे ? आपण तस जाहीर केलं की काम भागल.

गोअरिंग म्हणाला, 'तरीही दहा मेपर्यंत आपण वाट पाहावी अस मला वाटतं.'

हिटलरच्या सतापाचा पारा आणखी वर गेला. तो म्हणाला, 'माझ्या आतल्या आवाजाला हे बिलकूल मजूर नाही.

परतु गोअरिंगशी प्रतिवाद करणे त्याला त्यावेळी उचित वाटले नाही. तो एवढेच म्हणाला, 'ठीक आहे. तुझ म्हणणं मी मान्य करतो. परंतु कोणत्याही परिस्थितीत दहा मे हा दिवस टळता कामा नये.'

गोअरिंग आणि त्याच्या शेजारी बसलेला जनरल् जोड्ल् यांनी मुकाट्याने मान हलविली.

नऊ मे हा दिवस उजाडला तेव्हा कोणाचेही ऐकायची हिटलरची तयारी नव्हती. सकाळी कचेरीत येताच त्याने पश्चिम आघाडीच्या सेनानीकडे हुकूम धाडला – 'उद्या सकाळी पाच वाजून पस्तीस मिनिटानी हॉलंड आणि बेल्जम याच्या रोखाने आपल्या लष्कराची वाटचाल सुरू व्हायला हवी.'

त्या हुकुमावर सही केल्यानतर हिटलर आपल्या खास आगगाडीतून पश्चिम आघाडीवरील नव्या कचेरीकडे जायला निघाला. ही कचेरी बॅनच्या नैऋत्येला पचवीस मैलावर होती. वीस वर्षांपूर्वी झालेल्या राष्ट्रीय अपमानाचा सूड घ्यायला तो उत्सुक झाला होता. हे कार्य किती दिवसांमध्ये आटोपेल यासंबंधी प्रवासभर त्याचा विचार सुरु होता. त्यावेळी त्याच्या डोक्यात एकच शब्द घुमत होता – 'डॅन्झिग.'

हॉलंड–बेल्जमवरील स्वारीचे ते साकेतिक नाव होते.

लेब्रन यांच्याबरोबरचा विचारविनिमय आटोपून रेनॉ आपल्या कचेरीत येऊन दाखल झाले तेव्हा दहा वाजून वीस मिनिटे झाली होती. 'गामेलिन यांना बडतर्फ

करून उगाच अंतर्गत तेढ का वाढविता असे त्या तासाभराच्या चर्चेत लेब्रन रेनॉ यांना सारखे सागत होते आणि 'तसं करणं अत्यत अपरिहार्य आहे' असे रेनॉ त्यांना पटवून देण्याचा प्रयत्न करीत होते परंतु त्या दुबळ्या माणसाला ते काही पटत नव्हते. त्यामुळे रेनॉ कचेरीत आले ते सचित मनःस्थितीतच. दहा मिनिटांनी मन्त्रिमंडळाची बैठक सुरू होणार होती. तेथेही आपल्याला जर असाच विरोध झाला तर काय करायचे याचा त्याना या दहा मिनिटामध्ये निर्णय करायचा होता.

बरोबर साडेदहा वाजता रेनॉ यांनी बैठकीच्या खोलीत प्रवेश केला. कोणीच कोणाशी बोलत नाही. सारेजण गभीर चेहरा करून बसलेले आहेत असे आढळून येतांच रेनॉ यांना पुढच्या वादळाची कल्पना आली. तेही कोणाशी गप्पा मारण्याच्या भानगडीत पडले नाहीत. 'बैठकीचं कामकाज आता सुरू होत आहे' असे म्हणून त्यानी गामेलिन यांच्या हातून घडलेल्या प्रमादांची यादी वाचायला प्रारंभ केला. मधल्या आजारपणामुळे रेनॉ किती अशक्त झाले आहेत हे त्यांच्या ओढलेल्या चेहऱ्यावरून आणि खोल गेलेल्या आवाजावरून जाणवत होते.

रेनॉ यांच्या निवेदनाचा आशय असा होता की नॉर्वेमध्ये मित्रराष्ट्रांचा बोजवारा उडाला याला ब्रिटिशापेक्षा आपणच जबाबदार आहोत आणि त्याला कारणीभूत आहेत सरसेनानी गामेलिन. नॉर्वेमध्ये घुसलेल्या जर्मन सैन्याला पिटाळून लावण्याचा गामेलिन यानी काहीही प्रयत्न केला नाही असाच इतर लष्करी नेत्यांचा अभिप्राय आहे.

आपला घसा बरा नसल्यामुळे बैठकीमध्ये कोणीही धूम्रपान करू नये अशी रेनॉ यांनी प्रारंभीच सर्वांना विनंती केली होती. तरीही मध्येच एका मन्त्र्याने सिगारेट शिलगाविली. रेनॉ जे काही सुचवित आहेत ते आपल्याला मुळीच मान्य नाही हेच त्याला दाखवून द्यायचे होतें. 'मेहेरबानी करून सिगारेट ओढू नका, माझा घसा खरोखरच ठीक नाही' असे रेनॉ म्हणाले तेव्हाच कोठे त्याने सिगारेट विझविली.

अशक्तपणामुळे निवेदन वाचून दाखवायला रेनॉ याना दोन तास लागले. या निवेदनाचा सारा भर गामेलिन यांच्या बेजबाबदारपणावर असल्यामुळे अर्थमंत्री लामूर शेजारच्या मंत्र्याच्या कानात कुजबुजले –'प्रधानमंत्र्यांनी गामेलिन याना फाशीचीच शिक्षा सुनावली आहे की!'

निवेदन वाचून झाल्यावर रेनॉ आपल्या सहकाऱ्याना म्हणाले, 'गामेलिन याना जर आपण यापुढेही सरसेनापतीपदावर ठेवलं तर फ्रान्स हे युद्ध नक्कीच हरणार याबद्दल माझ्या मनात किंचितही शंका नाही. म्हणून आपण तातडीनं नवा सर-सेनानी नेमला पाहिजे असं मला वाटतं. तुमचं काय मत आहे?'

कोणीच बोलेना.

म्हणून रेनॉ आवाज चढवित म्हणाले, 'प्रत्येकानं आपलं जे काही मत असेल ते मला सांगितलंच पाहिजे.'

मग मात्र अर्थमंत्री लामूर बोलायला उभे राहिले. ते म्हणाले, 'प्रधानमंत्र्यांचं प्रदीर्घ निवेदन ऐकल्यानंतर तर गामेलिन यांना बडतर्फ करणं इष्ट होणार नाही याबद्दल माझी खात्रीच पटली आहे.'

लामूर यांनी हे मत व्यक्त करताच सगळेजण संरक्षणमंत्री दलादिए यांच्याकडे पाहू लागले. कारण या संरक्षणमंत्र्याची आपल्या सरसेनानीवर खास मर्जी आहे हे सगळ्यांना ठाऊक होते. आता आपल्याला बोलणे भाग आहे हे दलादिए यांना जाणवले.

ते सांगू लागले, 'नॉर्वेतील नामुष्कीला फ्रान्सपेक्षा ब्रिटनच अधिक जबाबदार आहे असं संरक्षणमंत्री म्हणून मला जी माहिती आहे त्यावरून स्पष्ट होतं. कारण तेथल्या लढाईची सूत्रं ब्रिटनकडे होतीं, आपल्याकडे नव्हती. असं असनाना नॉर्वेतल्या पराभवाचं खापर गामेलिन यांच्या माथी मारणं अन्यायाचं आहे. आता फ्रँको-जर्मन आघाडीबद्दल बोलायचं तर तिथं आपण होऊन प्रक्षुब्ध वातावरण निर्माण करायचं नाही असं मंत्रिमंडळानंच ठरविलं आहे. अर्थात गेल्या काही दिवसांमध्ये शत्रूच्या हालचाली वाढलेल्या असल्यामुळे आता आपण तातडीनं शस्त्रसज्ज झालं पाहिजे हे मला मान्य आहे आणि नेमक्या याच कारणासाठी गामेलिन यांचं नेतृत्व आवश्यक आहे. कारण एक तर त्यांचा अनुभव दांडगा आहे, शिवाय त्यांची हुषारी सर्वांनीच वाखाणलेली आहे. दुसरं असं की त्यांच्या वयाच्या दुसऱ्या कोणाही सेनानी-पेक्षा गामेलिन यांना कामाचा उरक चांगला आहे.'

इतके बोलून दलादिए थांबले नाहीत. गामेलिन यांना आपले म्हणणे मांडण्याची संधी देण्यात आली नाही याबद्दलही त्यांनी संताप व्यक्त केला. त्याचप्रमाणे सगळ्या मंत्रिमंडळापुढे प्रधानमंत्र्यांनी सरसेनानीची निंदा करावी ही गोष्टही आपल्याला आवडली नाही असे त्यांनी सांगितले. शेवटी ते म्हणाले, " उगाच कथ्याकूट करीत


पोरवाल
नेत्रांजन काजळ टूथ पावडर
FLASH
पोरवाल आणि कं., टिळक रोड, पुणे २.

वसणं मला आवडत नाही. म्हणून कोणाचं काही मत असो. गामेलिन यांच्या बडतर्फीला माझा सक्त विरोध आहे एवढच मला सांगायचं आहे!"

रेनॉ म्हणाले, "आणखी कुणास बोलयचं आहे का!"

सगळयांनी नकारार्थी माना हलविल्या. म्हणून अखेरचे मत अजमाविण्यासाठी रेनॉ यांनी दलादिए याना विचारले, "आपण आपला विरोध मागं घेणार नाही का?"

"नाही."

आता रेनॉ काय म्हणतात हे जाणून घ्यायला सर्वजण उत्सुक झाले होते. दलादिए यांनी विरोध केला तर काय करायचे हे बैठकीला येण्यापूर्वीच रेनॉ यांनी ठरविले होते. त्यामुळे दलादिए याच्या उत्तराने ते भांबावून गेले नाहीत.

अतिशय शात स्वरात ते म्हणाले, "मग हे मंत्रिमडळ विसर्जित करण्याशिवाय मला गत्यंतर नाही. मी आजच माझा राजीनामा अध्यक्षांकडे धाडून देणार आहे. तुम्हा लोकाना माझी एकच विनंती आहे. सध्याची परिस्थिती लक्षात घेता नवं मंत्रिमडळ सत्तारूढ होईपर्यंत ही बातमी बाहेर फुटता कामा नये."

एवढे बोलून ते आपल्या कचेरीत परतले.

आपल्या नेतृत्वावर रेनॉ यानी मंत्रिमंडळाच्या बैठकीमध्ये कडक टीका केली ही बातमी दुपारी गामेलिन याना समजताच ते सतापले. तात्काळ त्यानी आपला राजीनामा पॅरिसकडे धाडून दिला. त्या राजीनाम्याचे उत्तर येईपर्यंत त्यांना आघाडीवरची आपली कचेरी सोडता येण्यासारखी नव्हती. म्हणून त्या रात्री ते नेहमीप्रमाणे व्हिन्सेनेस येथल्या तंबूत झोपी गेले.

रात्री एक वाजता त्याना उठविण्यात आले. उठविणाऱ्या व्यक्तीला त्यांनी विचारले. "पॅरिसहून काही उत्तर आले आहे काय?"

"नाही."

"मग?"

गामेलिन यांच्या हातात एक लिफाफा देण्यात आला. शत्रु-प्रदेशात टेहेळणी करणाऱ्या तुकडीने तो धाडला होता. तो घाईघाईने फोडून त्यातला मजकूर वाचताच गामेलिन यांचा चेहरा पार बदलून गेला. हताश मनःस्थितीत ते खाली बसले.

दहा मेची पहाट उजाडली तेव्हा एकशे छत्तीस डिव्हिजन जर्मन सैन्य फ्रान्सच्या दिशेने निघाले होते.

आणि अशा वेळी फ्रान्सला प्रधानमंत्रीही नव्हता आणि सरसेनानीही नव्हता.

सत्तर वर्षांपूर्वी निर्माण झालेले तिसरे फ्रेंच प्रजासत्ताक हादरू लागले होते.

(क्रमशः)




एक कुदळ चुकून शिळेच्या माथ्यावर पडली.
पुन्हा टवका उडाला. ढलपा पडला.
तीही शिळा भंगली......

**म. वि. कोल्हटकर**

बाहेर तसे उजाडलेले. पण गाभाऱ्यात अंधार. विझत चाललेली समई. ज्योतीवर चढलेला टपोरा कोळी. गुरव ओलेत्यानेच येतो. भडाभडा मूर्तीला मंगलस्नान घालतो. ओंजळभर कण्हेरीची फुले वाहतो. माथा पायावर टेकतो. कुबट निर्माल्याचा वास. तीर्थाचे कुंडही तुंबलेले. गुरव भक्तिभावाने थार थेंब तीर्थ पितो. मूर्तीकडे डोळा भरून पाहतो. तो काय आश्चर्य ! मूर्तीचा डोळा ढळला आहे. उकलून बाहेर आला आहे. तो आता निखळणार. पाहता पाहता तो तुटला देखील. गुरवाच्या छातीत धस्स झाले. भरल्या घरात अपशकुन दिसावा तसे. गुरवाने त्वरा केली. डोळा उचलला. निमूटपणे जागच्याजागी चिकटवला. थोडासा दाबलादेखील. मग त्याने हात बाजूला काढला. डोळा तर जाग्यावर राहिलाच नाही. तो तात्काळ गळून पडलाच. पण तो पडतापडता आणखी भुगा खाली आला. डोळा होता तिथे खाच पडली. ती बघवत नव्हती. कशी बघवेल ? सर्वसाक्षी भगवान्. त्याचा डोळा निखळलेला कसा पाहवेल ?

गुरवाला कळून चुकले देव कोपला आहे. तो उठला. घावऱ्याघुवऱ्या पळत सुटला. ओवरीत एक पहिलवान धोतर नेसत होता. नुकतीच त्याने आंघोळ आटोपली होती. चारदोनजण प्रदक्षिणा घालीत होते. स्वतःच्या तोंडात लगावून घेत होते. गुरव पांढरा फटफटीत पडला होता. त्याच्या तोंडातून शब्द फुटेना. 'ब ब व्...बु ऽऽऽ...' त्याची बोबडी वळली. तेव्हा पहिलवान रांगड्या बोलीत म्हणाला 'अर ए गुरवा कुटं इचू डसला का ? बेंबीत बोट घातलं अच्चील' गुरवाने डोळे मोठे केले. भेदरलेल्या दृष्टीने तो गाभाऱ्याकडे पाहू लागला. 'द्येव द्येव कोपला. त्यो पहा. त्यो पहा. डोळा उचकटून बाहेर आला. भुगा भुगा पडतोया खाली. बंद हुईना झालाय्...' गुरवाला धाप लागली.

घाईघाईने निऱ्या खोवीत पहिलवान गाभाऱ्याकडे गेला. पहातो तो काय. मोठे खपले ढासळले होते.



गुरव ढसढसा रडू लागला. त्याचे रडणे गाभाऱ्यात घुमले. पहिलवानाच्या तोंडातून शब्द फुटेना.

प्रदक्षिणा घालणारे लोक धाईधाईने आले. पहातात तो काय. चक्क ओंजळभर खडे ढासळले आहेत. मधूनमधून आणखी खडे खाली येत आहेत.

बातमी मग देवळाच्या आवारापुरती मर्यादित राहिली नाही. ती गावभर दूषित हवेसारखी पसरली. लोक जमा होऊ लागले. जत्रेत येणार नाही इतके माणूस

लोटले. आवार तुडुंब भरले. जो तो चमत्कार पाहण्यासाठी धावू लागला. गर्दीचा गोंगाट उच्च चढत गेला. थेट कळसापर्यंत गेला. तिथे एक मधमाशांचे पोळे लोंबले होते. पोळ्यावरच्या माशादेखील चलविचल करू लागल्या.

'देवाधर्माचा सक्षेप केलात लेको. कोपेल देव नाही तर काय होईल.' ओंकारभट ऋद्ध होत्साते बोलू लागले. गाव मलूल चेहऱ्याने त्याचे बोलणे ऐकून घेऊ लागले. माणूस हवालदील झाले होते. त्याने धीर सोडला होता. गाभाऱ्यातला देव क्षुब्ध झाला होता. तो त्रागा करीत होता.

'सेवा करा देवाची. चला, उठा, कामाला लागा ' ओंकारभटाने फर्मावले.

मडळी आज्ञाधारकपणे कामाला लागली. कुणी झाडू घेतले. कुणी खुरपी. कुणी हाताने जमेल ते काम करू लागले. देऊळ साफ होऊ लागले.

'देवा, तुमच्या सेवेत काय उणे पडले. ही फरशी मी घातली. कळस चढवण्या-साठी देणगी दिली. दीन दास आहे मी तुमचा. मला आज्ञा करा फक्त. फक्त आज्ञा ' सावकार दीनवाणेपणाने म्हणत होता.

'शेंदूर थापायला हवा त्याच्या माथ्यावर तेव्हा तो शात होईल. भरगच्च शेंदूर आणा. वज्रलेप करू या. प्रेमाच्या वर्षावाने तो थंडगार होईल ' ओंकारभट म्हणाला.

आत अस्ताव्यस्त पसरलेली मूर्ती कणाकणाने ढळत होती. वर्षानुवर्षे चढलेले शेंदराचे लेप भुगा होऊन पडत होते.

सावकाराने शेंदूर आणला टिके भरून. ड्रमात रबरवीत कालवला. देवाच्या माथ्यावर थापला. देवाला ढासळण्याची उसतच तो आता देणार नव्हता. असा शेंदूर देवाला खायला घालू लागला

ते ओले ओझे देवाने अगावर घेतले. शांतपणे तो हसला. त्या ओलीने भली मोठी भेग पडली. ओला शेंदूर पसरला. घसरत खाली येऊ लागला. येताना त्याने जुना शेंदूर आणला.

'अभिषेकाचा थंडावा द्या त्याला. दूध आणा हडाभर. पळा. विलंब लावू नका ' ओंकारभटाने फर्मावले.

लोक घरी गेले. कुणी तांब्याभर, कुणी वाटीभर, कुणी कासडीभर असे दूध आणले गेले. घागरभर दूध जमा झाले. पांढरी धार देवाच्या अगाखांद्यावर खेळू लागली. वेदोनारायणांनी महाघोष केला. आकाशस्थ देवतांना त्यांनी साकडे घातले. पण गाभाऱ्यातला देव हट्टाला पेटला होता.

एकाएकी गुरव घुमू लागला. तो डोळे गरगरा फिरवू लागला. त्याच्या अंगी संचार झाला, तो थयथया नाचला. किंचाळला. मग त्याने नवसाच्या साऱ्या घटा जोरजोराने बडवल्या. रुपये ठोकलेल्या उबऱ्यावर कपाळ घासले. महाभयंकर गर्जना करून तो ओरडला, 'सोडा त्याला. गाडू नका. सोडा आधी. येऊ द्यात त्याला वर! गुरव मग विक्राळ हसला.

एकाने लगबगीने गुरवाच्या कपाळावर गुलाल फासला. दुसऱ्याने त्याच्या गळ्यात माळ चढवली. गुरव लालबुद झाला. त्याच्या चेहेऱ्यावरच्या शिरा तटतटल्या.

'त्याला मोकळे करा म्हणतो ना' गुरवाने बुबळे माथ्याकडे नेत तवी दिली.

लोकांनी मग गाभाऱ्याकडे मोहरा वळवला. लोक देवावरचे खळे काढू लागले. ढपेवर मारल्यावर गुळाचे खडे ढासळावेत तसे मोठमोठे तुकडे खाली येत होते. अस्ताव्यस्त पसरलेला देव भेगाळत होता. पिढ्यापिढ्यानी चढवलेली जीर्ण शेंदराची पुटे खाली येत होती.

'इथे विटाळ कालवलात. बोला कालावलात की नाही?' शिसारी आल्यासारखे नाक उच उचलून गुरव ज्याला त्याला विचारू लागला.

'भले शिरू लागले आहेत गाभाऱ्यात. व्हा सरा मागे. सावली नको. वारे नको तुमचे' गुरव महाराच्या पुढ्यात येऊन थयथय नाचू लागला.

महारे भेदरली. बिनबोभाट देवळाबाहेर गेली. उन्हातान्हात रडवेले चेहेरे घेऊन उभी राहिली. त्याच्या विटाळाने गावावर दुरित कोसळले होते. एक म्हातारा महार काठीवर भार टेकून उभा होता. तो खाली वाकला. त्याने स्वतःच्याच तोंडात मूठभर माती कालवली. तो रडूभेकू लागला, 'देवा, क्षमा कर, क्षमा कर.' तो पुन्हा पुन्हा म्हणत होता. 'मर्यादेने राहीन. कासराभर दूर राहीन. गाव आहे तर आम्ही...' तो देवाची आळवणी करीत होता.

लोक घामाघूम झाले होते. गाभाऱ्यात आखाडा माजला होता. सभोवती लोकांनी उकरले होते. पाट्यापाट्यांनी आणखी काळा, आणखी काळा शेंदूर बाहेर उजेडात येऊन पडत होता. जुना थर सर्वात वर रहात होता. ढीग उंचच होत गेला. अजस्त्र मूर्तीचा आवाका सापडेना.

गुरव एका एका खांबाला मिठी मारत होता. तो मुठी आवळत होता. दातओठ खात होता. त्याच्या देहाचे काष्ठ बेभानपणे नाचत होते.

'देवाला की हो विटाळलत्. अहो हे पाप कुठ फेडाल. अहो याना डोहात द्या कुणी लोटून...' गुरव ऊर पिटून ओरडत होता. जो तो एकमेकाकडे सशयाने पहात होता. तेव्हा ताणपट काढण्यासाठी गुरव जो धावला तो एका बाईपुढे उभा राहून हातवारे करू लागला. धोंडे उचलू लागला तेव्हा साऱ्या बायका बाहेर पसार झाल्या.

'आता त्यो येईल बाहेर. काढा बाहेर. काढा बाहेर. काढला का? काढला का?' गुरव आता ठेक्यात बोलू लागला. त्याला फार मोकळे वाटत होते. त्याचे कपाळ घामाने डवरले होते. त्याने ते धोतराच्या सोग्याने कोरडे केले.

'आला आला सापडला' गाभाऱ्यातून आरोळी उठली. गर्दी उसळली. लोक गाभाऱ्याकडे धावू लागले. तिथे काय होते? शेंदराचा घट्ट प्रस्तर. दगडासारखा टणक.

जोराच्या घावाने हा प्रस्तरही खंडित झाला. पुन्हा जिवाचा आटापिटा. देवाचा मोक्ष करण्यासाठी कटिबद्ध झालेला ग्रामस्थाचा जमाव टिकाव, फावडे, खोरे जे हाताला येईल ते चालवू लागला.

'देऊळ यादवकालीन आहे. बांधणी हेमाडपंती आहे.' मास्तर म्हणाले.

'अहो यादवराजांनीदेखील याला नवस केले होते म्हणतात.' सावकार म्हणाले.

'अहो, गावाला याने पाडसे दिली. खिल्लार पुरवले.' एक म्हातारा सांगू लागला.

'याला बळी द्या बळी.' गुरव बोलू लागला. तो जीभ बाहेर काढू लागला. भुकेने वखवखल्याप्रमाणे ती ओठावरून फिरवू लागला.

'आणा बोकड. आणा अगोदर. बांधा खांबाला. पूजा करा त्याची. अरे, कुठाय बोकड? बळी आणायला ही चालढकल काय? मग घ्या सारे शाप. पटकीची साथ येईल. गाठीचा रोग येईल. पटापट मराल. वणवा पेटल. घरं जळतील ..' गुरव कडाडा बोटे मोडू लागला.

चार दोन जाणत्या माणसांनी पैसे जमा केले. धष्टपुष्ट बोकड देवळाकडे आणण्यात आला. बोकड भयानकपणे ओरडत होता. ओठ खात होता. एकाने त्याचे


आमची उत्तम औषधे

बौद्धिक श्रम व मानसिक अशांतता
यांवर अत्यंत गुणकारी औषध

**प्रशम** जीवनसत्त्व ब–१ युक्त

सर्व प्रकारच्या खोकल्यावर
गुणकारी औषध

**व्हॅसोसिन**

**आयुर्वेद रसशाळा पुणे**
कर्वे रोड, पुणे ४

मुस्काट आवळले. त्याची किंकाळी बाहेर फुटूच दिली नाही. मग त्याची मान तड-फडली. श्वास संपला. मान लोंबू लागली.

गाभारा चहूबाजूंनी उखणला गेला होता. जुन्या शेंदराचा भुगाच भुगा जमा होत होता. दोन तीन गाड्यांचा ऐवज बाहेर आला होता. देवाचे देखणे रूपडे पहायला मिळणार ही आशा जो तो मनाशी धरून होता. साक्षात्काराचा क्षण समीप आला होता. देव जवळ आला होता, खूप जवळ आला होता...काही बोटांवर...पिढ्यापिढ्यांचा प्रतिपाळ करणारा तो ग्रामस्थांचा रखवालदार आता गर्भद्वार फोडून बाहेर येणार होता. लोक जिवाचा आकांत करून उकरत होते. शेंदराचा ढीगच ढीग उभा करत होते.


'हा यादवकालीन थर' मास्तर म्हणाले.

'कदाचित्, सातवाहन काळातलाही असेल. देऊळ फार जुने आहे.' एक तरुण म्हणाला. त्याने सातवाहन कालीन शेंदूर मुठीत घेतला. लख्ख उजेडात येऊन त्याने मूठ उघडली. त्या भुग्याचा वास घेतला. देवाच्या पायाशी विसावा घेत पडलेल्या त्याच्या पूर्वजांच्या आशा, निराशा, वासना, भावना या साऱ्यांना त्याने स्पर्श केला होता.

अंगणात शेंदरी रेतीचा ढीग मोकळे ऊन खात होता. भराभरा घमेली झेलली जात होती.

गाभारा चहूबाजूंनी उकरला होता. माती सैल करून घेण्यात आली. तिची देवाभोवतीची पकड ढिली करण्यात आली. लोक आता हट्टाला पेटले. ते देवाला खिळखिळा करून बाहेर काढणार होते. आता आत काय होते ? ओल्या मातीचा दर्प आणि कोमट अंधार.

'सापडला. देव सापडला' एकच गर्जना उठली. एकच कल्लोळ उठला. एक शिळा पहारेच्या रेट्याने थरारत वर आली. भूगर्भापासून ती विलग होऊ लागली. लोक कृतार्थतेच्या भावनेने त्या शिळेकडे पाहू लागले. एक कुदळ चुकून शिळेच्या माथ्यावर पडली. पुन्हा टवका उडाला. ढपला पडला. तीही शिळा भंगली. तो शेंदराचाच प्रस्तर होता तर. एकूण गाभारा उत्सन्न. भुगाच भुगा. मूर्ती आहे कुठे मग ? तिथे होता नुसताच गाभारा.



# भारतात पहिल्यानेच!

# नव्या भिंतींसाठी नवा पेण्ट –

# डेकोप्लास्ट

नव्या प्लॅस्टरवरही प्रायमरशिवाय
लावता येतो.
उन्हापावसात
वर्षानुवर्षे
टिकून
राहतो.




**सिमेंट पेण्टशी
तुलना केल्यास:**

- □ मजुरीचा खर्च ४०% कमी!
- □ रंगकामाच्या ७ क्रियांऐवजी दोनच पुरेत!
- □ पाचपट जास्त भाग रंगविता येतो!

डेकोप्लास्ट बेस व्हाइटमध्ये मॅजिकटच मिसळून ४० मनपसंत रंगछटा झटपट तयार करता येतात. शिवाय ५ पक्के, गर्द रंग तयारच मिळतात.

जीवनातील रंगसंगती म्हणजेच **एशियन पेण्ट्स**

## अनुभवांचे वेगळेपण

# पहाट

पुस्तकावर लेखकाचे अपरिचित नाव पाहिलं की पुस्तक वाचायला सुरुवात करतानाच माझ्या मनात शंका असते. कारण आज मराठी मासिकातून लिहिणारे अनेक नवोदित लेखक एकाच साच्याच्या प्रेमकथा लिहिताना दिसतात. कदाचित मागणी तसा पुरवठा या अर्थशास्त्रीय सिद्धांतानुसार हें घडत असेल. परंतु सामान्य साहित्याचे फार मोठे पीक मराठी ललित साहित्याच्या क्षेत्रात सध्या येत आहे. वास्तविक दिवसानुदिवस जीवन अधिक गतिमान होत असताना नव्या अनुभवांचे शब्दांकन करण्याचे आव्हान नव्या लेखकानी स्वीकारायला हवे (अर्थात् यामुळे मराठी साहित्याचा दर्जा वाढेल असा माझा भाबडा समज नाही.) पण असे घडत नाही. व म्हणूनच अपरिचित लेखकाचे पुस्तक वाचायला सुरुवात करतानाच मला एक प्रकारची भीती वाटते.

अशाच अवस्थेत सौ. आशा परचुरे यांचा 'पहाट' हा कथासंग्रह वाचायला सुरुवात केली. परंतु संग्रह वाचून झाला तेव्हा भीतीचे निराकरण झाले होते. बारा कथाच्या या संग्रहात, सवंग लोकप्रियतेच्या मार्गाने जाण्यापेक्षा, जीवनातील वेग-वेगळया अनुभवांना शब्दरूप देण्याचा प्रयत्न आढळतो. 'गमभन' या पहिल्याच कथेत लहान मुलांच्या मनाचा वेध घेण्याचा प्रयत्न दिसतो. तर 'तो आणि मी' या रांगणेकर व भागवत यांच्या आयुष्यभराच्या स्पर्धेच्या निवेदनातून नियतीचे अटळ रूप आणि माणसाचे गूढ अंतरंग याचे दर्शन घडते. 'नवस' ही कथाही नियतीच्या अशाच भीषण रुपाचे दर्शन घडवते. तर 'शिक्षा'सारखी कथा आजच्या समाजजीवनातील 'डॅडी–ममी' संस्कृती लहान 'बेबी'च्या निष्पाप निरागस जीवनावर नकळत कसे अत्याचार करते याचे चित्र रेखाटताना दिसते. 'स्पर्श' ही या संग्रहातील म्हटली तर एकमेव प्रेमकथा. पण ती चाकोरीतील नाही. ही कथा आहे महारोग झालेल्या एका तरुणाच्या मनात अपरिचित तरुणीविषयी विकसित होणाऱ्या अभिलाषेचे व त्या अनुषंगाने त्याच्या मनातील आंदोलनांचे शब्दांकन करणारी. अशीच आणखी एक लक्षणीय कथा 'जिज्ञासा.' ही कथा जुन्या पिढीला नव्या पिढीच्या जीवनाचे असलेले सुप्त आकर्षण व्यक्त करणारी. अशा तऱ्हेने अनुभवाची विविधता हा या संग्रहाचा एक विशेष आहे. 'स्पर्श' 'जिज्ञासा' यासारख्या कथा जीवनाकडे पाहून नवे नवे अनुभव घेण्याची क्षमता लेखिकेजवळ आहे याच्याच दर्शक आहेत.

परंतु केवळ अनुभवाच्या विविधतेतून कथासग्रह वाचनीय ठरेलच असं नाही त्यासाठी ते शब्दातून व्यक्त कसे होतात यालाही महत्त्व असतं. सौ. आशा परचुरे यांच्याजवळ अलकारांनी नटवी झालेली, वाङमयीन भाषेबद्दल अपसमज बाळगून कृत्रिम झालेली अशी भाषा नाही. साध्या अनलंकृत भाषेत अनुभव निवेदनाची पद्धत त्यानी स्वीकारली आहे. एक दोन कथा अपवाद म्हणून सोडल्या तर घटनांतून कथा विकसित करण्याकडे त्यांचा कल आहे. अनुभवातील विविधता, व निवेदनातील सहज सरलता यामुळे हा सग्रह वाचनीय होतो.

अर्थात एकादी साहित्यकृती वाचनीय असणे आणि कलादृष्टया चागली असणे यामध्ये भेद असतो. म्हणून सग्रह वाचनीय आहे असे म्हटले की तो कलादृष्टया श्रेष्ठ आहे असा निष्कर्ष निघत नाही. कलादृष्टया अनुभव काय आहे आणि तो कसा व्यक्त झाला आहे या दोन्ही गोष्टींना महत्त्व असते. सौ. आशा परचुरे यांचे अनुभव विविध आहेत पण ते सपन्न आहेत असे जाणवत नाही. आणि ते व्यक्त होत असताना नवखेपणाच्या खुणा अनेक आढळतात. काही ठिकाणी कथेत व्यक्त होणारा अनुभव अनुभवाच्या पातळीपर्यंत गेला आहे असे जाणवत नाही. उदा. पहिल्याच कथेतील 'शैलेश'ची भाषा व त्याचे वागणे यात सुसंगती आढळत नाही. सहाजिकच या मुलाचे वय काय असा प्रश्न मनात उ।। राहतो. अशावेळी वाटते अनुभव जाणवला आहे. पण तो कलानुभवाच्या पातळीवर जाण्यापूर्वीच लेखन झाले आहे. अशा लेखनात कृत्रिमता जाणवते. अशी कृत्रिमता 'जिज्ञासा' सारख्या चागल्या कथेतही आढळते. या कथेतील जानकी आपल्या मुलाचे व सुनेचे बोलणे ऐकण्यासाठी समुद्रावर त्यांच्यापासून थोडया दूर अंतरावर लपून बसते आता ही युक्ती कृत्रिम आणि बालिश आहे. पण अशाप्रकारच्या अनेक युक्त्या लेखनात जाणवतात. अशा कृत्रिमतेबरोबरच काही ठिकाणी रचनेच्या नेमकेपणाचा अभाव जाणवतो. उदा० 'मृत्युगोल' कथेतील ऑफीसचे वातावरण, मिस् गाडगीळची व्यक्तिगत समस्या व त्यातून जीवनाच्या रहाटगाडग्याचा हा जणु मृत्युगोल आहे असा तिला येणारा अनुभव या घटकांचो माडणी अतिशय विस्कळित आहे. काही ठिकाणी कथांचे शेवट विलक्षण कृत्रिम आहेत. (उदा० 'वास्तु' 'अखेर') ही कृत्रिमता कधी शेवट फार भावनात्मक करण्याच्या हेतुतून तर कधी काहीसा धक्का देण्याच्या हेतुतून निर्माण झाली आहे. काहीही असले तरी असे 'शेवट' कथेच्या रूपाला धक्का देणारे ठरले आहेत.

अशा प्रकारच्या लेखनात आढळणाऱ्या नवखेपणाच्या खुणामुळे लेखन कलादृष्टया श्रेष्ठ पातळी गाठू शकत नाही. परंतु अनुभवाचे वेगळेपण व विविधता आणि सहज सरल शब्दाकन यामुळे कथा वाचनीय व अपेक्षा निर्माण करणाऱ्य आहेत हे निश्चित.

— दिगंबर पाध्ये

[ पहाट : सौ. आशा परचुरे : परचुरे प्रकाशन : मूल्य सात रुपये ]



# वेडा की शहाणा!

**एक लाख लोकांना काही क्षणात नष्ट करायचं...**
**हजारोंना यमयातना भोगण्यासाठी जिवंत ठेवायचं**
**हे कर्तव्य असेल तर मग मी कर्तव्य केलं नाही**
**मी खून केले, एक लाख खून...**

**याच भावनेने पछाडलेल्या वैमानिकाची ही करुण कथा...**

**डॉ. शरद अभ्यंकर**

---

टेक्सासमधल्या शेतातून जाणाऱ्या एका अरुंद रस्त्याने एक तरुण धुळीचे लोट उडवित चालला होता. फाटके तुटके बूट, धुळीने माखलेले कपडे आणि घामाने चिंब झालेले अंग, अशा अवतारात भर उन्हात तो गेले कित्येक दिवस असाच भटकत होता. आपण आलो कोठून, चाललो आहोत कुठे, खाल्ले की नाही, काम

कुठले आणि किती वेळ केले या कशाचीच त्याला शुद्ध नव्हती. श्रमामुळे झालेल्या तीव्र वेदनानीं सारे अंग ठणकत असतानाही तो तसाच फरफटत खाली मान घालून पुढे चालला होता. कारण या साऱ्या वेदनांचेपेक्षा तीव्र अशी त्याच्या मनातील अपराधाची जाणीव त्याला असह्य होत होती.

'रामराम.' बाजूच्या शेतातून आवाज आला, त्याबरोबर त्या तरुणाने चमकून मान वर केली. एका कापसाच्या शेतात बरेच निग्रो आणि मेक्सिकन मजूर काम करीत होते. शेताच्या मालकाने त्या तरुणाला साद घातली होती. 'राम राम', तो उत्तरला. 'काही काम मिळेल का मला तुमच्याकडे ?'

'तू काही मजुरी काम करणारा दिसत नाहीस' मालक उत्तरला.

'पहा तर काम देऊन. मी चागले काम करतो.'

'इथला दिसत नाहीस तू. खर ना ?'

'होय.'

'कुठून आलास ?'

'कुठूनही नाही.' तो तरुण थोडा चिडून म्हणाला, 'आणि त्याच्याशी काय आहे! मला काम पाहिजे आहे.'

शेतकरी सगळे सशयखोरच! त्याने त्या तरुणाच्या दाढी वाढलेल्या चेहऱ्याकडे आणि किमती पण फाटून गेलेल्या कपडयाकडे बघितले, आणि विचारले, 'कधी कापूस वेचला होतास का ?'

'हो.'

'बघू तुझे हात ?' त्या तरुणाने हात पुढे केले चिरण्या पडलेले, फोड आलेले, खरचटलेले हात होते त्याचे.

'शेतकामाची सवय नाही तुला, नक्कीच. कोणतं गाव म्हणालास ?'

'व्हॅन अल्स्टाईन. टेक्सास.'

'नाव काय तुझ ?'

'हे पहा, तुम्हाला मला काम द्यायच आहे का नाही ? उगाच उलट तपासणी चालवलीय!'

'पोलीस मागावर आहेत काय तुझ्या ?' शेतकऱ्याने मध्येच विचारले.

'नाही.'

'शेतात काम शोधायच्या आधी काय करत होतास ?'

आता मात्र तो तरुण संतापला. मुठी आवळून चेहरा वेडावाकडा करीत तो ओरडला. 'माणस मारत होतो मी माणसं! झालं समाधान ? एक नाही, दोन नाही, एक लाख!' त्याचा आवाज चढू लागला. 'एक लाख माणसं मारली मी,

एक लाख !' आणि मोठमोठ्याने किंचाळत तो पळू लागला. डोक्यात गर्दी करणाऱ्या त्या भयानक आठवणीच्यापासून दूर.

५ ऑगस्ट १९४५. पॅसिफिक महासागरातील टिनियन बेटावरील अमेरिकन हवाईदलाची छावणी. 'ऑफिसर्स क्लब' या नावाने ओळखल्या जाणाऱ्या एका खोपटवजा बराकीत चारजण पोकर खेळत बसले होते. बरेच डाव जिंकणाऱ्या एका अधिकाऱ्याला उद्देशून दुसरा एकजण म्हणाला, 'साला हा इथर्ले फार नशिबवान आहे खरा. चला बंद करा झालं डाव आता.' इथर्लेने जिंकलेले पैसे खिशात टाकत जांभई दिली, आणि तो म्हणाला, 'पुरे तर पुरे ! उद्या एखादे वेळेला लांबच्या पल्ल्यावर जावं लागेल.'

केवळ २३ वर्षांचा असूनही इथर्ले अमेरिकन हवाई दलात मेजरच्या हुद्यावर होता. सदैव हसतमुख, आकर्षक व्यक्तिमत्व, पत्त्यातील प्रचंड नशीब, आणि विमानोड्डाणातील अत्युत्कृष्ट कसब ही त्याची वैशिष्टये होती. इथर्लेचे सहकारीही सर्वोच्च दर्जाचे वैमानिक होते. किंबहुना त्यामुळेच त्याची निवड या बेटावरील खास गुप्त शिक्षणाकरता झाली होती. आपल्यावर कोणती कामगिरी सोपविली जाणार याची मात्र त्याच्यापैकी कुणालाच कल्पना नव्हती.

५ ऑगस्टचा पोकरचा खेळ संपल्यावर काही तासातच या साऱ्याना उड्डाण-पूर्वतयारीच्या खोलीत बोलावण्यात आले आणि मानवी युद्धाच्या इतिहासात अवि-स्मरणीय अशा कामगिरीवर जाण्याच्या सूचना त्याना देण्यात आल्या. सूचना साध्याच होत्या. पहाटे निघून जपानवर जायच आणि एक बॉंब टाकून परत यायचं ! एक बॉंब ! एका इवल्याशा बॉंबकरता एवढी तयारी ? इतकी गुप्तता ? पण प्रश्न करणं आपलं काम नाही या भावनेने सर्वजण उड्डाणाला सज्ज झाले.

इथर्लेच्या बी–२९ सुपरफोर्ट्रेस बॉंबफेक्या विमानाचं नाव होतं 'स्ट्रेट फ्लश.' पोकरमधल्या सर्वात भारी डावाचं नाव त्याने मुद्दाम आपल्या आवडत्या विमानाला दिलं होतं. नेहमीच्या सरावानं त्यानं विमान चालू केलं; पण आजची कामगिरी काही विशेष महत्त्वाची आहे, याची सूक्ष्म जाणीव त्याला होतच होती. पण त्याकडे दुर्लक्ष करून त्याने मिळालेल्या सूचना अंमलात आणण्यास सुरुवात केली.

प्रथम लक्ष्याच्या दिशेने उड्डाण – सात तासाची दीर्घ भरारी – हवाई परिस्थितीचा अदाज घेणे – शत्रूच्या हालचाली आढळल्यास कळवणे – बॉंब असणाऱ्या विमानाशीं सल्लामसलत – सर्व ठीक असल्यास हिरोशिमावर उड्डाण आणि···तो एकुलता एक चिमणा बॉंब तिथे टाकायचा....पुढे ? पुढे काय याची कल्पना कुणालाच नव्हती. अगदी तो बॉंब बनवणाऱ्या शास्त्रज्ञांनासुद्धा.

ज्या विमानात बॉंब होता त्याच नाव होतं 'एनोला गे.' त्याचा वैमानिक

ले. कर्नल पॉल टिबट्स याने आपल्या आईचे नाव त्याच्या विमानाला दिले होते. या विमानामध्ये एक प्रचड शक्तिशाली शस्त्र असून त्याचा वापर म्हणजे एक ऐतिहासिक घटना होईल, एवढेच या वैमानिकांना माहीत होते.

सात तासाच्या ह्या सफरीत अनेक विचार इथर्लेच्या मनात येऊन गेले. हे ऐतिहासिक अस्त्र म्हणजे अॅटमबॉंब तर नसेल ना ? पण अॅटमबॉंब ही त्यावेळी तर एक केवळ कल्पना , हूल होती म्हणे ! या एका बॉंबने एक सपूर्ण शहर नष्ट होते म्हणे ! इथर्लेने युद्धात भाग घेतला होता त्यामुळे युद्धात माणसे मरतातच याची त्याला जाणीव होती. पण संपूर्ण शहर ? हे मात्र फार झालं हं ! आणि इतक्या शक्तिशाली बॉंबमुळे खुद्द त्याच्या विमानाला धोका पोचला नसता का ? या विचारांचा कंटाळा आल्याने इथर्लेने लहानपणचे सुखद दिवस आठवायला सुरुवात केली.

व्हॅन अल्स्टाईन गाव. डलास शहराच्या अगदी जवळ. खरेदीला, सिनेमा, नाटकाला, फुटबॉलचे सामने पहायला केव्हाही डलासमध्ये जाता यायचं ! इथर्ले घराण चागलंच श्रीमत होतं. शाळा-कॉलेजच आयुष्य मजेत गेलं होतं अगदी. नॉर्थ टेक्सास राज्याच्या फुटबॉल सघात इथर्लेची निवड झाली होती.

मग ७ डिसेंबर १९४१ ला पर्ल हार्बरवर जपानने हल्ला चढवला. इथर्लेने लगेच हवाईदलात नाव दाखल केले. विमानोड्डाणावर त्याने थोड्याच अवकाशात प्रभुत्व मिळवले. पुन्हा युद्धाच्या कटू आठवणी आल्या. जाऊंदे त्या. युद्धानतर पुढे काय त्याचा विचार करू ! व्हॅन अल्स्टाईनला परत गेल्यावर किती मजा येईल ? पण मग इथर्लेला जाणवलें, आपण आता पूर्वीचे स्वत्व गमावून बसलो आहो. या युद्धाने आपल्यात केवढा बदल घडवला आहे मानवी हत्या करण्यात आपल्याला काही वाटतही नाही. छे ! भविष्यकाळाचा विचारही फारसा सुखदायक नाही. आता तो तसा होणारही नाही. हातातल्या कार्यावर लक्ष केंद्रित करावं हेच बरं.

हवामान – उत्तम. शत्रूची विमाने – मागमूसही नाही. पहाटेच्या गुलाबी छटा किंचित दिसू लागल्या आणि खाली जपानचा किनारा. मनातले इतर विचार बाजूस सारून इथर्ले यंत्रासारखा कामगिरी बजावू लागला. आसपासचा हवाई प्रदेश, हवामान, खालील लक्ष्य यासंबंधी माहितीचा अंदाज घेऊन तो 'एनोला गे' ला भेटण्याच्या सकेतस्थळाकडे गेला. क्षणार्धातच समोरून ठिपक्यासारखे दिसणारे 'एनोला गे' वेगाने जवळ येऊन पोचले. 'हिरोशिमा बसलेल्या बदकासारखे उडवायला सोपे आहे' असा त्याने अहवाल सादर केला. आता कामगिरी सुरू झाली 'एनोला गे'चा वैमानिक टिब्बेर याची.

त्याच्या विमानातले मदतनीस कामाला लागले रात्रभर अवघडत बसून त्याचे हातपाय आखडले होते. पुरे ५०० पौंडही वजन नसणाऱ्या त्या विचित्र अस्त्राविषयी सर्वांना कोडे होते. पण आता विचार करायला वेळ नव्हता. सकाळचे

८ वाजून १० मिनिटे झाली होती. हिरोशिमावरून ३०,००० फुटावरून त्यांचे बी. २९ चालले होते. त्याच्या मागे १५ मिनिटांच्या अंतरावर मेजर इथर्लेचे 'स्ट्रेट फ्लश' येत होते. बाँब टाकल्यावर होणाऱ्या स्फोटाची (स्फोट झालाच तर) आणि विध्वसाची पहाणी करण्याचे आता त्याचे काम होते. होय. पहिल्या ॲटम बाँब-नतर होणाऱ्या विध्वंसाची पहाणी ! शास्त्रज्ञांनी या बाँबच्या चाचण्याही इतक्या घाईत आणि जागचे जागी (static) घेतल्या होत्या, की त्यानाही काय काय होईल याची कल्पना नव्हती !

बाँब टाकण्याचे काम सुरू झाले. 'एनोला गे' चा 'गोलदाज' मेजर थॉमस फेरेबी याने आता विमानाचा कब्जा घेतला. वैमानिक त्याच्या इशाऱ्यानुसार विमान चालवू लागला. गेले कित्येक दिवस पुन्हा पुन्हा केलेल्या तालमी आणि हवाई नकाशाचा अभ्यास यामुळे हिरोशिमा त्याला स्वतःच्या गावापेक्षाही जास्त ओळखीचे झाले होते. आज ते प्रत्यक्ष दिसत होते. सुदैवाने ढग, धुके वा शत्रूची विमाने यापैकी कशाचाच अडथळा नव्हता.

८ वाजून १५ मिनिटे. फेरेबीने बाँब सोडणारी कळ दाबली, आणि तो इवलासा इतिहास घडविणारा बाँब सकाळच्या उन्हात चमकत गरगरत खाली जाऊ लागला. हिरोशिमाच्या नागरिकांनी त्या दिवशीही नित्याप्रमाणे आपले रोजचे व्यवहार सुरू केले होते. सनिकांच्या कवायती सुरू झाल्या होत्या. कारखान्यातले कामगार, शाळेत जाणारी मुले यांची रस्त्यावर गर्दी उसळली होती. उंचावरून जाणाऱ्या एकुलत्या एक अमेरिकन बाँबफेक्या विमानाकडे कुणी लक्षही दिले नाही. अशी विमाने वरून नेहमीच जात; पण हिरोशिमापेक्षा महत्त्वाची लक्ष्ये अन्यत्र असल्यामुळे तशीच पुढे जात. हवाई हल्ल्याचा इशारा देणारा भोंगा वाजला पण त्याकडेही बहुतेकानी दुर्लक्षच केले. उलट काहीजण कुतुहलाने त्या विमानाकडे पाहू लागले. विमानातून लहानशा हवाई छत्रीला लोंबणारी काही वस्तू खाली येतानाही त्यानी पाहिली; पण फारच अल्पकाळ !

बाँब पडला त्या जागेपासून दोन मैलावर एक मुलगेलासा कारकून एका कचेरीत खिडकीशेजारी काम करत होता. त्याच्या शब्दात बाँबच्या परिणामाचे वर्णन—

'प्रथम जाणवला देदीप्यमान पाढऱ्या प्रकाशाचा प्रखर झोत. इतका प्रखर की डोळे जातात की काय असे वाटले. ज्याच्यामुळे सूर्यही दिसेनासा झाला, सावली अशी कुठे राहिलीच नाही; मी तात्काळ खिडकीपासून लाब पळालो आणि जमिनी-वर पालथा पडलो.' हा उजेड प्रत्यक्षात १/१०,००० सेकंद इतकाच टिकला, पण त्या मुलाला तो संपतच नाही की काय असे भासले. रंग वेगळे ओळखेनासे झाले, प्रकाशाची तीव्रता मेंदूपर्यंत पोचून वेदना निर्माण करू लागली. डोळे झाकून घेऊनही त्याची जाणीव हटेना.

प्रकाशाच्या या प्रचंड स्फोटानतर जाणवली उष्णता, अति दाहक, जाळणारी,

भाजणारी, सर्व शहराला लाटावर लाटांनी वेढणारी, अति तीव्र उष्णता. शरीराचा उघडा असणारा भाग या उष्णतेच्या महान लाटेत करपून, शिजून, तळून निघतोय असे वाटन त्या मुलाने भीतीने किंकाळी फोडली.

पण ही किंकाळी कुणीही ऐकली नाही. त्याने स्वतःसुद्धा. कारण तोपर्यंत स्फोटाचा प्रचंड आवाज सर्वत्र गर्जू लागला होता. आवाजाची तीव्रता इतकी भयानक होती की आपला मेंदू बधीर होऊन तीव्र वेदनांनी त्याचा लगदा होतो आहे असा त्याला भास झाला. तरीही स्फोटाच्या आवाजाच्या लाटावर लाटा येतच होत्या. हजारो तोफा एकदम उडाव्या, सर्व ज्वालामुखी एकदम भडकावेत,...छे, या आवाजाला योग्य अशी उपमाच नव्हती! स्फोटाच्या या दणक्याने त्याच्या संज्ञा इतक्या बधीर झाल्या होत्या की ती संपूर्ण इमारत कोसळून पडली. त्याचा आवाज त्याला अजिबात ऐकू आला नाही. मूकपटातल्यासारखं भासलं ते दृश्य. इमारत पडायला कारण झाला होता स्फोटाच्या पाठोपाठ आलेला प्रचंड हवेचा दणका. वादळापेक्षाही अफाट वेगाने आलेल्या वाऱ्याच्या या लाटा सर्वत्र पिसाटासारख्या घुमत होत्या आणि मोठमोठ्या इमारती पत्त्यांच्या बंगल्याप्रमाणे उडवून लावीत होत्या. कोसळलेल्या इमारतीच्या पडक्या ढिगाऱ्यात हा कारकून अर्धवट बेशुद्धावस्थेत अडकून पडला होता. वाऱ्याचे तांडवनृत्य हळूहळू कमी झाले आणि मग सुरू झाल्या आगी. जिकडे तिकडे आगीच्या ज्वाळा आपल्या आपण निर्माण होऊ लागल्या आणि आपल्या इवलाल्या जिभा फिरवत इकडे तिकडे काही भक्ष्य मिळते का पाहू लागल्या. आपल्या स्वतःच्या हातावर आगीची लाल गुलाबी ज्योत उत्पन्न झालेली त्याने अजाणतेपणाने पाहिली आणि काय होतंय हे समजायच्या आतच दुसऱ्या हाताने ती विझवली. आता शिल्लक राहिले होते इमारतींचे ढिगारे, जिकडे तिकडे पेटणाऱ्या



आगी आणि धूर. दृष्टी आणि श्रवणशक्ति परत स्थिरस्थावर होताच तो मुलगा हळूहळू उठू लागला. धडपडत तो ढिगाऱ्यावरून खाली आला. त्याच्या कचेरीतल्या काही मुली 'आई, आई' असा आक्रोश करीत धावताना त्याला दिसल्या. त्याच्या अंगावरचे कपडे जळून गेले होते आणि त्या रक्तबंबाळ झाल्या होत्या. एका मुलीचे स्तन डाळिंब उकलावीत तसे फुटले होते. त्यांना मदत करायला तो धावला पण त्याला काही दिसेनासेच झाले. तशाही स्थितीत स्वत.च्या आईचा विचार मनात येऊन तो घराच्या दिशेने धावू लागला. कचेरीपासून १ मैलावर स्फोट झाला त्या बाजूला त्याचे घर होते.

एकाद दुसऱ्या इमारतीचा पोकळ डोलारा सोडल्यास सर्व शहर जमीनदोस्त झाले होते. जळणाऱ्या मृतदेहाचा भयानक दर्प सुटला होता. वेदनांनी ओरडत, अवयव छिन्नविच्छिन्न झालेले हजारो लोक स्फोटाच्या त्या नरकापासून दूर पळण्याचा प्रयत्न करत होते. अनेकांचे कपडे जळाल्यामुळे ते नग्नावस्थेत पळत होते. काहीची शरीरे भाजून लालभडक झाली होती. काहीची शरीरे बघता बघता सुजली होती. पाठ सपूर्ण जळालेली आणि एक हात जवळ जवळ तुटलेला एक माणूस एकाच हाताने ढिगारा उकरीत होता. इतर कोणाला ढिगाऱ्यात मानवी हाडे आणि जळक्या देहांचे अवशेष सापडत होते. जळणाऱ्या इमारतीतून जीव वाचवण्याकरता रस्त्यावर उड्या टाकल्यामुळे मृत्युमुखी पडलेल्या अनेक नागरिकांचे मृतदेह या पळणाऱ्या लोकांच्या पायात अडकत होते. मोठमोठाल्या तेलकट मातट थेंबाचा पाऊस आता पडू लागला होता. लोकांना हायसे वाटले. पण त्याना बिचाऱ्याना काय कल्पना हा पाऊस नसून महाभयानक किरणोत्सर्गी द्रवाच्या रूपाने कोसळणारा मृत्यूच होता. एका माणसाचे दोन्ही डोळे नष्ट झाले होते आणि नुसत्या खोबणीतून रक्त ठिबकणाऱ्या अवस्थेत तो चाचपडत होता. काहीही इजा न झालेले एक लहान मूल एका भयानक मृत देहापाशी शांतपणे बसून होते आणि शेकडो हजारो माणसांचे कोळशासारखे काळे पडलेले मृतदेह लाकडाच्या ओडक्यासारखे जिकडे तिकडे पडले होते. त्या मुलाचे घर तर पार भुईसपाट झाले होते. काही काळ त्या दृश्याकडे सुन्न होऊन तो पहात राहिला आणि मग त्या राखेच्या ढिगाऱ्यावर बसून रडू लागला.

विमानातल्या अधिकाऱ्याना अर्थातच या गोष्टी दिसत नव्हत्या त्यांना दिसलेले दृश्य वेगळेच होते बाँब सोडण्याची कळ दाबली जाताच टिब्बेरने विमान ४५ अंश कोनात कलते केले आणि पुढे काय होते ते सर्वजण पाहू लागले. साठ सेकंदे गेली आणि पुढे दिसलेल्या भयानक उत्पाताच्या दृश्याने त्यांची मने गोठून गेली. संरक्षक काळे चष्मे असूनही प्रथम उडालेल्या तेजस्वी प्रकाशझोतामुळे टिब्बेर मंत्रमुग्ध झाला. मग सर्वत्र धूर, दगड, विटा, माती याचा लोट उडाला आणि क्षणार्धातच त्यातून ४०,००० फूट उंचीचा भूछत्रासारखा लोट प्रचंड वेगाने उफाळून वर येऊ लागला. 'अरे बापरे, परत आपल्या कडेच येतय ते!' सार्जंट शमर्ड ओरडला. उड्डाणपूर्व

सूचनांमध्ये या कशाचाच उल्लेख नव्हता. आपल्या दिशेने येणारी गोष्ट धोक्याची आहे किंवा कसे याचा विचारही न करता टिब्बेरने आपले विमान वेगाने टिनिअन बेटाकडे पिटाळले आणि एकाही विमानाला वा सैनिकाला धक्कादेखील न पोचवता आपण शत्रूचे केवढे प्रचंड नुकसान केले या आनंदात गप्पा मारत ते परत आले.

त्यांच्यामागून येणाऱ्या इथर्लेने आपले विमान त्या प्रचंड भूछत्रासारख्या लोटा-भोवती फिरवले आणि खाली दिसणाऱ्या प्रचड नुकसानीकडे तो आ वासून पहात राहिला. चार वर्षे हवाईदलात शिक्षण घेतल्यामुळे मारण्याची वा मरण्याची त्याची तयारी होती. त्यामुळे शात चित्ताने तो आपला अहवाल तयार करीत होता. पण आपल्या कृत्याच्या भयानकतेने त्याचे मन पोखरण्यास कुठे तरी खोल सुरुवात केली होती.

तीन दिवसानंतर नागासाकी शहरावर दुसरा अॅटमबाॅंब टाकण्याची कामगिरी इथर्ले आणि त्याच्या सहकाऱ्यानी पार पाडली. तोपर्यंत हिरोशिमा शहरातील नुक-सानीचे आकडे टिनियन बेटावर येत होते. ८०,००० मृत्यू. ७२००० जबर जखमी. हिरोशिमा शहर ६०% पूर्णपणे नष्ट. आणि याहीपेक्षा भयानक—अण्वोत्सर्गामुळे झालेल्या एकेक भयानक दुखापतीची आणि व्याधीची वर्णने. या एकेका हकीगती बरोबर क्लॉड इथर्लेचे मूळ व्यक्तिमत्त्व हळूहळू नष्ट होत होते. त्याच्या मनाची हळूहळू खात्री होत होती की या साऱ्या महाविनाशाला आपण स्वतः कारणीभूत आहोत. ' माझे विमान हल्ल्याच्या वेळी सर्वात पुढे होते. मी त्यांना ' सब ठीक'चा इशारा दिला. बाॅंब टाकण्याची कळ कुणीही का दाबलेली असेना, त्याने त्याला मार्गदर्शन केले होते. कर्तव्य ? एक लाख निरपराध स्त्रिया, पुरुषांना, निष्पाप कोवळ्या मुलाना काही क्षणात नष्ट करायचे आणि हजारो इतर नागरिकांना अण्वोत्सर्गामुळे निर्माण होणाऱ्या व्याधीच्या यमयातना भोगत जिवत ठेवायचे ! हे कर्तव्य असेल तर थुत् त्या कर्तव्यावर !! मी कर्तव्य केल नाही, मी खून केले ! एक लाख खून !!

या भीषण हल्ल्याचा थोडाफार मानसिक परिणाम त्यात भाग घेणाऱ्या प्रत्ये-काला जाणवला. एक ब्रिटिश अधिकारी (त्याच्याकडे नागासाकीच्या विध्वंसाची पहाणी करण्याचे काम होते. ) सैन्यातून निवृत्त होऊन धर्मोपदेशक बनला. पण इतर सर्वांचा धक्का थोड्याच काळात ओसरला. त्यांना सर्वांना हा हल्ला म्हणजे युद्धाच्या डावपेचापैकी अप्रिय पण आवश्यक भाग वाटला. अजूनही वाटतो. काही वर्षापूर्वी ' एनोला गे 'चे ' गोलंदाज ' मेजर (आता कर्नल) फेरेबी यांना एका वार्ताहराने विचारले. ' आज पुन्हा अशी कामगिरी बजावायला तुम्ही तयार आहात का ?' त्यांनी उत्तर दिले. ' मला हुकूम देण्यात आला. मी तो पाळला. युद्ध समाप्तीनतर आठ दिवसानी मी हिरोशिमाला भेट दिली. तियला विध्वस पहात असताना ' आमची कामगिरी आम्ही उत्तम रीतीने पार पाडली याचा अभिमान

मला जाणवत होता.' नागासाकीवरील हल्ल्याचे गोलंदाज कर्नल बहॅम म्हणाले, 'झालं गेलं होऊन गेलं. आता चर्चा करून काय उपयोग? मला माझ्या कृत्याचा अजिबात पश्चात्ताप होत नाही. अणुबाँबमुळे युद्ध लवकर संपले. आम्ही जपानच्या भूमीवर चढाई केली असती तर किती प्राणहानी झाली असती कोणास ठाऊक!' 'एनोला गे'चा सहवैमानिक मेजर लेविस – 'मला या कामगिरीबद्दल नंतर कधीही विषाद वाटला नाही.' आणखी एक कर्मचारी स्टिबोरिक – 'इतर लाखो बाँब टाकले; हा जरा जास्त शक्तिशाली होता, एवढेच!'

नशिबवान होते हे सैनिक! एकटया क्लॉडच्या मनावरचा परिणाम मात्र दिवसेदिवस खोल जाऊ लागला. ह्याचा आनंदी खेळकर स्वभाव जाऊन तो अबोल, कुढा बनला. रात्र रात्र पोकर खेळून जागवणाऱ्या क्लॉडला आता पत्त्यांबद्दल शिसारी आली. त्याचे दोस्त त्याला आग्रह करीत – 'चलो यार, शराब पिएंगे, ताश खेलेंगे! जरा जिंदगीका मजा तो लूट हो!' त्यांच्या निर्दयी निर्विकार-पणाची इथर्लेला चीड येई. 'पत्ते! शराब!' तो विचार करी, 'जपानमध्ये लाखो लोक मेले आहेत, लाखो तडफडत पडले आहेत, आणि या अमानुषांना नाच, गाणी आणि जुगार आठवतोय!'

युद्ध संपून घरी परत गेल्यावर इथर्ले पूर्वस्थितीला येईल अशी त्याच्या सह-काऱ्यांची कल्पना होती.

घरी पोचताच इथर्लेचं प्रचंड थाटामाटाने स्वागत करण्यात आलं. कर्णकटू आवाज करणारे वाद्यघोषांचे ताफे, स्वागतपर भाषणे, अभिनंदने, मानपत्रे, याची एकच धमाल उडाली. या साऱ्या धुमाकुळात इथर्ले घामाघूम होऊन बावरून समोरच्या गर्दीकडे निर्विकार डोळ्यांनी पहात राही. त्याच्या पत्नीने या त्याच्या नाजूक मानसिक स्थितीचा तोल सावरण्याकरता त्याला धीर देऊन, प्रेम देऊन जिवापाड प्रयत्न केले; पण इथर्लेला समोरच्या गर्दीत चेहरे दिसत ते मृत लोकांचे, जखमी बालकांचे, असहाय्य स्त्रियांचे असत. शेवटी एका समारंभाचे वेळी हा मानसिक ताण असह्य होऊन इथर्ले व्यासपीठावरून उडी टाकून पळत सुटला. आपली वीर-चक्रे आणि शौर्यपदके त्याने फेकून दिली आणि अंधार पडल्यावर एका गवताच्या कोठारात बसून तो रडू लागला. गावकऱ्यांना धक्काच बसला.

पण इथर्लेच्या प्रियपत्नीने याही अवस्थेतून सावरण्यास त्याला मदत केली. इथर्ले बराच सुधारला. पण गणवेष घातलेला कोणीही माणूस पाहिला, मग तो पोस्टमन का असेना, की त्याच्या मनातील भीती उफाळून येत असे. त्याच्या पत्नीने हरप्रयत्न करून त्याला पूर्वस्थितीवर येण्यास मदत केली. पण तो दिवसेदिवस बिघडतच चालला. रात्री त्याला श्वास गोठवून टाकणारी भयानक स्वप्ने पडत. भीतीने ओरडत, हातपाय झाडत, घामाने डबडबलेल्या अवस्थेत तो जागा होई. चेहरा वेडावाकडा करत किंचाळू लागे. त्याच्या पत्नीचे सांत्वनाचे सर्व प्रयत्न निष्फळ

ठरत. 'उठ, उठ !' तो ओरडू लागे. 'सामान बांध. मला हिरोशिमाला पाठवणार आहेत. लहान मुलांचं काय झालं ते पहायला...'

अखेर तिलाही माघार घ्यावी लागली. इथर्लेवर जिवापाड प्रेम असूनही तिला निराश होऊन घटस्फोट घ्यावा लागला. आणि हा आधार सुटल्यावर अर्धवट वेडा झालेला इथर्ले वैराण अवस्थेत घर सोडून भटकू लागला. मोलमजुरी करत शेतावर इतर कामगारांच्या बरोबर राहून आपल्या अपराधी जीवनाचा विसर पाडण्याचा तो प्रयत्न करी. पण ही अवस्था फार काळ टिकत नसे. जास्त पुढच्या अवस्थेला गोष्टी जाण्यापूर्वी तो बरेचवेळा गुपचूपपणे दूर कोठे निघून जाई, तर पुष्कळदा 'मला युद्ध खात्यातर्फे बोलावणे आले आहे. ताबडतोब गेले पाहिजे !' असे सांगून इतर कामगारांना आश्चर्यचकित करून निघून जात असे. कधी कधी एखाद्या सहज उच्चारलेल्या शब्दाने त्याच्या भावना उद्दीपित होऊन तो ओरडू लागे.

अखेर शेवटी इथर्ले स्वतः होऊन वॅको येथील माजी सैनिकी रुग्णालयात दाखल झाला. इथे उपचार करून सुधारल्यावर त्याला सोडण्यात आले. पण इथर्लेचे नष्ट-चर्य संपले नव्हते. बारीक सारीक गुन्हे करण्याबद्दल त्याला अटक करण्यात आली. आणि मग, अटक, सुटका, वॅको रुग्णालय, उपचार, सुटका, जरा बरे दिवस, पुन्हा गुन्हे, पुन्हा अटक असे दुष्टचक्र सुरू झाले. इथर्लेच्या वर्तनाबद्दल न्यायाधीश आणि मानसोपचारतज्ञ दीर्घकाळ चर्चा करीत, ती तो स्वतः शांतपणे ऐकून घेत असे.

अमेरिकन सरकारने इथर्लेला महिना २३७ डॉलर्स निवृत्तिवेतन मजूर केले. ही आनंदाची बातमी सांगणाऱ्या सैनिकी रुग्णालयाचे डॉक्टराचे अंगावर चेक आणि कागदपत्रे फेकून इथर्ले ओरडला 'कसले पैसे ? खुनाचा बोनस ! फेकून द्या तें. त्यापेक्षा चोऱ्या करून जगलेलं काय वाईट !' आणि खरोखर तो तसे करू लागला.


स्वादिष्ट मिठाईसाठी
आम जनतेची निवड

# शर्मा स्वीट मार्ट

दत्त मंदिराशेजारी, मंडई रस्ता, पुणे २.


डॉक्टर म्हणतात, दोन वेळा त्याने आत्महत्त्येचा प्रयत्न केला. केव्हा कसा कोण जाणे! काही मानसोपचारतज्ञांचे म्हणणे पडले की 'हिरोशिमाच्याही आधी त्याच्या आयुष्यात घडलेल्या एकाद्या घटनेमुळे ही विकृती निर्माण झाली असावी; कारण अणुबाँब हल्ल्यात प्रत्यक्ष भाग घेणाऱ्या इतर ४१ जणांना असे काहीही झाले नाही. खरे काय असेल ते समजणे अवघडच आहे.

प्रश्न उरतो तो हा की आपण केवळ निमित्तकारण होतो हे माहीत असूनही लाखो लोकांच्या प्राणहानीला स्वतःला जबाबदार धरणाऱ्या भावनाशील इथर्लेला खरोखरच वेडा म्हणावे काय? या अतिभीषण हत्त्येचा मनावर काहीही परिणाम होऊ न देता एक कर्तव्य म्हणून त्याच्याकडे पहाणारे इतर हवाई अधिकारी श्रेष्ठ आणि नीतिमान समजायचे का? मग इथर्लेसारखी भावनाप्रधान, माणुसकी असणारी सज्जन व्यक्ती लष्करी अधिकारी होण्याला अयोग्य समजायची? उलट विचार असा येतो की इथर्लेसारखेच बहुसख्य साधेसुधे नागरिक या जगात वावरत आहेत. तुम्ही आणि मी सुद्धा त्यापैकीच आहोत. कुणी सांगावे आपण त्याच्या जागी असतो तर आपली त्याच्यापेक्षाही वाईट अवस्था झाली असती. जगात शातता नांदायची असेल तर इथर्लेसारखे 'वेडे'च आज आवश्यक आहेत. नाही तर मानवी मर्कटांच्या हातात मिळालेले हे अणुअस्त्राचे कोलीत साऱ्या जगाचा संपूर्ण विनाश घडवून आणील. बर्ट्रंड रसेल, महात्मा गांधी, मार्टिन ल्यूथर किंग, येशू ख्रिस्त, भगवान बुद्ध या 'शहाण्या' लोकांना मानवी जीवन अहिंसापूर्ण करण्याचे 'वेड' लागले होतें.

मग इथर्लेला आपण काय म्हणू या? वेडा की शहाणा?

◻ ◻ ◻


सर्व प्रकारची वाद्ये मिळण्याचे विश्वसनीय ठिकाण




नाविन्यपूर्ण इलेक्ट्रिक गिटार, मॅंडोलीन व बुलबुलतरंग इत्यादींचे आद्य प्रवर्तक

हरिभाऊ विश्वनाथ कं.

संगीत वाद्यालय

दादर, मुंबई २८.



सुधाकर राजे

## ◻ चि. निरोधकुमार, कु. परिसीमा

केरळमधल्या एका दांपत्याला लूप वापरूनही मुलगी झाली म्हणून तिचे नाव लूपिका ठेवण्यात आले आहे असे परवा वर्तमानपत्रात वाचले. छान ! आता या लूपिकेच्या पाठीवर निरोधकुमार केव्हा होणार ? साधारणपणे आपल्या सरकारी योजनांची अखेर जी फलश्रुती होते ती पाहता अशी आणखी बरीच नावे तयार होऊ शकतील. प्रथम म्हणजे आपल्या पेट्रोलियम मंत्र्यांचे नाव त्रिगुण सेन आहे तर संततिनियमन मंत्र्यांचे नाव वास्तविक पाहता त्रिकोण लाल असायला हवे होते. पर-राष्ट्र – मंत्रालयातल्या कुठल्याही अधिकाऱ्याला कन्यारत्न झाल्यास तिचे नाव तटस्थिता ठेवण्यात येईल हे सुज्ञास सांगणे नलगे. त्याचप्रमाणे चंदीगड, बेळगाव वगैरे सीमांतरे सोडवू पाहणाऱ्या गृहमंत्रालयातील अधिकाऱ्याला मुलगी झाली तर तिला एकच नाव शोभेल, व ते म्हणजे परिसीमा. कराच्या वाढत्या बोज्याखाली दडपल्या जाणाऱ्या कुठल्याही मध्यमवर्गीयाने यापुढे आपल्या मुलाचे नाव मधुकर किंवा प्रभाकर न ठेवता आयकर ठेवले तर नवल नाही. राजकारणाच्या क्षेत्रात वरचेवर टोपी फिरवणारे आयाराम व गयाराम प्रसिद्ध आहेतच. त्यांच्या जोडीला ‘पिशवी’ गमावलेला संस्थानिक यापुढे आपल्या मुलीचे नाव कांचन न ठेवता निष्कांचन ठेवील तर कोलमडलेल्या मंत्रिमंडळाचा मुख्यमंत्री आपल्या मुलाचे नाव अच्युत न ठेवता पदच्युत ठेवील.

## ◻ मांजराची नाइट ड्यूटी

सिंगापूरमध्ये एक माणूस एका तळ्यात उतरल्याने पाणी ढवळले गेले व तळ्यातल्या माशांना म्हणे त्रास झाला म्हणून त्याला कोर्टाने पंचवीस डॉलर दंड केला. आता बोला ! या माशांचे त्याने कालवण केले असते तर हरकत नव्हती, त्यांना फ्राय केले असते तरी चालले असते, पण त्यांच्या दुपारच्या झोपेत त्याने व्यत्यय आणला हा अर्थातच अक्षम्य गुन्हा होता. ते काही असले तरी निरनिराळे पशुपक्षी माणसांवर अशा पद्धतीचे खटले करू शकतील असे मला वाटते. उदाहरणार्थ, सतत

नाइट–ड्यूटी करावी लागणारे माजर, भुंकून घसा बसलेला कुत्रा, रद्दी कुरतडून रद्दी जीवन जगावे लागणारा उंदीर, मंत्र्याची पोपटपंची ऐकावी लागणारा पोपट, सक्तीचे संततिनियमन करावे लागणारे कबूतर, इतकेच काय पण प्रत्येक हिंदी सिने-माच्या प्रत्येक गाण्यात फुकटचा दाबून दमलेला कुठलाही ' पंछी ' या सर्व मंडळींना खरोखरच न्याय मिळायला हवा. ते कोर्टाची पायरी चढायच्या आधीच हा न्याय द्यायचा असेल तर कुत्र्यांना डॉगबिस्किटाच्या जोडीला पेप्सच्या गोळयाही दिल्या पाहिजेत. माजराचा नाइट–ड्यूटीचा त्रास सपावा म्हणून सर्व उंदराना सपावर जायला भाग पाडले पाहिजे. याच उंदराची बिकट अन्नसमस्या सुटावी म्हणून कुरत-डाव्या लागणाऱ्या प्रत्येक संपादकीयाबरोबर त्याना खोबऱ्याच्या तुकड्याचा महा-गाई भत्ता मिळायला हवा. मंत्र्यांच्या मिठूला आठवड्यातून एक दिवस तरी स्वतःच बँकांचे राष्टीयीकरण किंवा नक्षलवादाची समस्या असल्या एखाद्या योग्य विषयावर भाषण करण्याची सधी मिळावी. कबुतरांना संततिनियमनाच्या गोळ्या चारणाऱ्या उपद्व्यापी पाश्चिमात्यांना या कबुतरांनी निक्षून सागावे–हम दो, हमारे बीस ! अन् शेवटी हिंदी सिनेमातल्या त्या बिचाऱ्या पंछीला निदान एक तरी फिल्म फेअर ॲवॉर्ड मिळावे.

## ◻ राजकारण खेळणारा कॉंप्यूटर


भारत सरकारच्या एका गणितज्ज्ञ अधिकाऱ्याने अशी कल्पना मांडली आहे की कुठल्याही देशाच्या परराष्ट्रीय धोरणाचे आकड्यात रूपांतर करून गणित मांडता येईल व तसे केले तर आतरराष्ट्रीय राजकारणाच्या समस्या कॉंप्यूटरमध्ये घालून सोडविता येतील. कल्पना एकदम अफलातुन आहे, अन् भारत सरकारचे परराष्ट्रीय धोरण म्हणजे शून्य येथून सुरुवात करायला हरकत नाही. चीनपासून सिलोनपर्यंत प्रत्येक देशाला भारतीय प्रदेश वाटण्याची भारत सरकारची उदारता पाहता भार-तीय परराष्ट्रीय धोरण बव्हंशी वजाबाकीवर आधारलेले दिसते. बेरीज होते ती फक्त पाकिस्तानला पाठविलेल्या निषेध–खलित्याची. पार्लमेंटच्या सभासदानी ब्रिट-नच्या भारत–विरोधी धोरणाचा गाजावाजा करून ठाम मत मांडायला भाग पाडले तर असा भागाकार मांडण्यात येतो की, कॉमनवेल्थच्या कायद्याला ब्रिटिश अरेरा-वीने भाग दिला तरी बाकी बरीच उरते. भारताच्या परराष्ट्रकारणात गुणाकार फारसा वापरला जात नाही. परदेशी पाठविण्यात येणाऱ्या शिष्टमंडळाचा हिशेब ठेवण्यासाठीच काय तो गुणाकार वापरावा लागतो. प्रसगी भारतीय परराष्ट्रीय धोरणात बिजगणितही उपयोगी पडते. कारण बिजगणितात सर्वात मोठा प्रश्न क्षची किंमत शोधून काढणे हा असतो, व भारतीय परराष्ट्रकारणात हा क्ष म्हणजे निक्सन की कॉसिजिन याचे उत्तर मोठमोठ्या गणितज्ज्ञांना अजून सापडलेले नाही.

◻ ◻ ◻

[ पृष्ठ १६ वरून ]

करणाऱ्याला त्रास होतो, वाहतुकीलाही अडथळा येतो. अनेकदा त्यामुळे अपघातही होतात. या सर्वांवर साधा सोपा उपाय म्हणजे मोटारचे चाक [ tire ] मुळी सबंध रबरी बनवावयाचे. या चाकात खिळे ठोकले, त्यात दगड घुसले, इतकेच काय त्याच्यात बंदुकीच्या गोळ्या झाडल्या तरी काही होत नाही. मोटारच्या साध्या चाकात एक प्रकारचा रबर भरून त्याच्यावर निरनिराळ्या तपमानाच्या क्रिया केल्या की हे चाक तयार होते. या चाकावर होणारा उष्णतेचा परिणाम, त्याचे वजन या गोष्टीबाबत अधिक संशोधन झाले की हे चाक बाजारात येईल. पण एवढी साधी कल्पना अजून कोणाच्या लक्षातच आलेली नव्हती.

ड्युक विद्यापीठातल्या ड्युराम या तरुणाने मात्र ही रबरी चाकाची कल्पना मागासलेली आणि म्हणून त्याज्य ठरविली ! तो म्हणाला, ‘ रबरी चाके तयार करणे, गतिमान रस्त्यांची (High way) निर्मिती करणे, रेल्वे मार्ग बांधणे हा काही वाहतुकीचा प्रश्न सोडविण्याचा खरा मार्ग नव्हे. खरा ‘ मार्ग ’ थोडा वेगळा आहे. हा मार्ग अनुसरला तर वाहतुकीचा प्रश्न सुटेल. अपघात टळतील. मोटरच्या इंधनामुळे शहरे दूषीत होणार नाहीत. त्याच्या मते जमिनीखाली एका शहरापासून दुसऱ्या शहरापर्यंत पंधरा फूट व्यासाच्या पोलादी बंद नळ्यांचे बोगदे तयार करावेत. त्यानंतर छोट्या छोट्या बंद पोलादी नळकांड्यात माणसे व सामान ठेवण्यात येईल. यानंतर मोठ्या पोलादी बोगद्यामधून प्रचंड दाबाखाली हवा सोडण्यात येईल. या हवेच्या दाबामुळे आतील छोटी छोटी नळकांडी ताशी शंभर ते दीडशे मैल या गतीने प्रवास करू लागतील. – या योजनेमुळे मोटारीवरचा व इंधनावरचा खर्च एवढ्या मोठ्या प्रमाणावर वाचेल की केवळ पाच वर्षात पोलादी मार्ग तयार करण्यासाठी केलेला खर्च भरून येईल. या प्रदर्शनात अनेक शास्त्रज्ञांनी या सर्वस्वी नव्या कल्पनेचे मनापासून कौतुक केले.



‘ एक्स्पो ७० ’ मध्ये दाखविलेले
मोटारचे नवे रबरी चाक

# बहरला पारिजात दारी....

आपल्या विज्ञान मंदिरातून गेल्या सहा महिन्यात काही नवे शोध बाहेर पडले. राचीच्या केंद्रीय इंधन संशोधन प्रयोगशाळेने वेगवेगळया प्रतवारीचे कोळसे बनविणारी एक भट्टी तयार केली आहे. आपल्या पोलाद कारखान्यासाठी लागणारे उच्च प्रतीचे कोळसे ही भट्टी बनवू शकेल. रुडकीच्या संशोधन मंदिरात एक वेगळया प्रकारची भट्टी बनविण्यात आली. खेडयापाडयात भट्टयांना इंधन म्हणून चुनखडीचा दगड वापरला जातो. या जुन्यापुराण्या भट्टयात खूप इंधन फुकट जाते. सर्वत्र सारखी उष्णता पोचत नाही. रुडकीची नवी भट्टी या अडचणी दूर करेल. आपल्या परंपरागत भट्टीपेक्षा या भट्टीची किंमत खूप कमी आहे. चंदीगडच्या संशोधन विभागाने संपूर्ण भारतीय बनावटीचा 'शून्यकारी निर्वात पंप' बनविलेला आहे. या नव्या उपकरणामुळे काही लाख रुपयाचे परकीय चलन पुढील वर्षी वाचू शकेल. नवी दिल्लीमधील केंद्रिय रस्ते निर्माण महामंडळाच्या संशोधन विभागाने एक नवे उपकरण बनविले आहे. या उपकरणामुळे रस्ते तयार करताना सिमेंटमध्ये माती, पाणी, रेती, सिमेंट याचे प्रमाण काय होते हे फार थोडया वेळात ठरविता येईल. यापूर्वी हे ठरविण्यासाठी रासायनिक पद्धत वापरावी लागे. त्याला खूप वेळ लागे. या नव्या उपकरणामुळे हायड्रोजनच्या परमाणूचे परस्पर प्रमाण मोजले जाते व काही तासाच्या आत कंत्राटदाराने कोणत्या प्रतीचा रस्ता बनविला आहे हे ओळखता येते.

सर्वात महत्त्वाचा शोध म्हैसूरच्या केंद्रीय संशोधन विभागातील डॉ. एन्. सिंह यानी लावला आहे. जगभर सर्वत्र 'ल्युसर्न' नावाचे एक रानटी गवत मुबलक प्रमाणावर मिळते. या गवतावर काही रासायनिक प्रक्रिया करून या गवतातले 'प्रोटीन' वेगळे करण्यात डॉ. सिंह यशस्वी झाले आहेत. वेगळे केलेले हे प्रोटीन जनावराना दिल्यास जनावरे अधिक दूध देतात. या प्रोटीनवर आणखी काही प्रक्रिया केल्या तर मानवी अन्न म्हणूनही हे प्रोटीन उपयुक्त ठरू शकेल. जगभरच्या अनेक प्रयोगशाळा या विषयावर संशोधन करीत होत्या. आणि आजच्या घडीला तरी या सशोधनात डॉ. सिंह आघाडीवर आहेत. विस्कान्सीन विद्यापीठातले जीव–रसायनशास्त्राचे प्राध्यापक डॉ. मार्क स्टेहमन यांनी एक खास लेख लिहून डॉ. सिंह यांच्या संशोधनाची प्रशंसा केली आहे. मध्यतरी एका परिसंवादाचे वेळी डॉ. सिंह मला भेटले होते. भारतात आपल्या संशोधनाकडे दिले जावे तेवढे लक्ष दिले जात नाही अशी तक्रार त्यांनी त्यावेळी नकळत माझ्याकडे केली.–झाड सत्यभामेचे दारी आणि फुले मात्र रुक्मिणीच्या अंगणात असा प्रकार भारतीय संशोधनाबद्दल घडू नये एवढीच विज्ञानेश्वरीची इच्छा आहे. ◻ ◻ ◻

कॅन्सर
एक असाध्य रोग
अशीच आजपर्यंतची
सर्वसामान्य लोकांची कल्पना.
पण
प्रगत वैद्यकीय शास्त्र
काही वेगळेच सांगते...

# कॅ न्स र

इंद्रसेन डोंगरे

भूतलावर असे काही नाही जे मनुष्याने आपल्या बुद्धिसामर्थ्याने आणि भगिरथ प्रयत्नानी जिंकून घेतले नाही! एवढेच नव्हे, तर आता त्याची झेप अंतराळात देखील पोहोचली. त्याने दोनदा चंद्र जिंकला!! परंतु कॅन्सर मात्र त्याला अजूनही अजिंक्यच राहिला!!! त्याचे आकलन त्याला पूर्णपणे झालेले नाही. कॅन्सर म्हणजे काय? तो का होतो? कॅन्सरचा फैलाव सर्व देशात सारखाच आहे की काही देशात कमी व काही देशात जास्त? निरनिराळ्या देशात निरनिराळ्या कन्सरचे प्रकार आढळतात काय? तसेच विशिष्ट जाती–जमातीशी, श्रीमंती–गरीबीशी या रोगाचा काही संबंध आहे काय? असे अनेक प्रश्न अनेकांच्या मनात उद्‌भवणे साहाजिकच आहे. आणि याची उत्तरे काय, हेही समजावून घेण्याची इच्छा असते. त्या दृष्टीने आजमितीस उपलब्ध असलेली माहिती या संक्षिप्त लेखात देण्याचा प्रयत्न केला आहे.

कॅन्सर आजही असाध्य खराच; पण एके काळी कॅन्सरचे कारणदेखील अज्ञात आहे, असे समजत. ठोकळमानाने पाहाता आजदेखील हे खरे आहे तथापि, खाण्या-पिण्याच्या सवयी, विशिष्ट जात–जमात आणि सांपत्तिक स्थिती वगैरे गोष्टींशी या रोगाचा निकट संबंध आहे; हे आता निदर्शनास येत आहे! दाताची सदोष कवळी, तुटके दात, उपदंश, दारू पिणे अथवा जीवनसत्वांचा अभाव या प्रचलित

कारणाखेरीज पान खाण्यानेदेखील तोंडाचा कॅन्सर होतो, असे काही 'केसिस' पाहाता दिसून येते. विडी ओढण्यासारख्या अन्य सवयीमुळेही कॅन्सर होण्याची शक्यता असते. बऱ्याचदा पान खाणाऱ्याच्या तोंडात विधातक गाठी आढतात. सतत धूम्रपान करण्याचा घशाच्या कॅन्सरशी निकट संबंध असल्याचे दिसून येते.

## भारतातील परिस्थिती

मुंबई येथील टाटा मेमोरियल हॉस्पिटल हे भारतातील कॅन्सरचे एक मोठे रुग्णालय. तेथील प्रसिद्ध भारतीय कॅन्सर चिकीत्सक डॉ. जे. सी. पेमास्टरच्या मते प्रत्येकी एक लाख लोकांपैकी ८५ व्यक्तींवर कॅन्सरची कृष्णछाया पडलेली दिसते. गेल्या २० वर्षांपेक्षा कॅन्सरच्या रोग्यांचे प्रमाण भारतात आता बरेच वाढले आहे असे डॉ. पेमास्टर यांचे मत आहे; परंतु लोकांचे वाढते आयुष्यमान आणि उन्नत तपासणी पद्धती लक्षात घेता, याबाबतची परिस्थिती फार बिघडली आहे, असे म्हणता येणार नाही. असेही त्यांना वाटते.

टाटा मेमोरियल हॉस्पिटल येथील कॅन्सरविषयक चिकित्सेसंबंधी बोलताना डॉ. पेमास्टर सांगतात की, "आम्ही रोज ४० ते ५० रोग्यांना प्रवेश देतो. त्यांपैकी निम्मे तरी कॅन्सरची शिकार बनलेले असतात..." सदर इस्पितळात १९४१ पासून कॅन्सरच्या प्रत्येक रोग्याची नोंद ठेवण्यात आली आहे. सन १९४१ ते १९६० पर्यंत ४,८०७२ रोग्यांची नोंदणी करण्यात आली. येथे दरवर्षी ४,५०० रोग्यांवर शस्त्रक्रिया करण्यात येते. आणि शस्त्रक्रियेबरोबरच रासायनिक चिकित्सा व क्ष-किरण चिकित्सा यांच्या साहाय्याने कॅन्सरविरुद्ध अवितरपणे घनघोर युद्ध चालविलेलें असते.

कॅन्सरची विचित्रता अशी की, शरीरातील कोणत्याही भागातील त्वचा, रक्त, हड्डी किंवा अवयवाची भरमसाठ वाढ होऊ लागते. त्यामुळे जी गाठ बनते, तिलाच कॅन्सर म्हणतात. ही गाठ जर जागच्या जागीच राहिली, तर तो साधा कॅन्सर ठरतो. परंतु त्या गाठीपासून एखादा तुकडा जेव्हा विभक्त होऊन शरीराच्या अन्य भागात पसरून वाढू लागतो; तेव्हा त्याला दुर्दम कॅन्सर म्हणतात. हा पहिल्या प्रकारच्या कॅन्सरपेक्षा अधिक घातक असतो, हे उघडच आहे.

कॅन्सरचे निरनिराळे प्रकार असून त्यापैकी काहीची कारणे चांगली माहीत आहेत, तर काहीच्या मागील कारणें पूर्णांशाने माहीत नाहीत. कॅन्सरचे प्रकार खालीलप्रमाणे होत :

**फुप्फुसांचा कॅन्सर :** जास्त धूम्रपानामुळे हा होतो.

**तोंड, टाळू, जीभ यांना होणारा कॅन्सर :** हा कॅन्सर तंबाखू खाण्याने होतो. उत्तर प्रदेशातील आग्रा, मैनपुरी जिल्ह्यात तसेच आंध्र प्रदेशातील विशेषतः मुसलमान स्त्रियांत हा प्रकार अधिक आढळतो.

**कांगडी कॅन्सर :** कांगडी म्हणजे काश्मिरमधील गरीब लोक थंडीपासून बचाव

करण्यासाठी जी शेगडी गळ्यात अडकवितात ती शगडी ! या शेगडीमुळे जी आच निर्माण होते ती पोटाला सतत लागते आणि पोटाच्या चामडीला हा रोग होतो.

**छुट्टा कॅन्सर :** आंध्र प्रदेशामधील काही भागात छुट्टा ओढण्यामुळे टाळूला हा कॅन्सर होतो. छुट्टा एक प्रकारचा ‘ सिगार ’च होय, ज्याचे जळते टोक तोंडात धरून धूम्रपान करण्याची प्रथा आहे.

**शिश्न कॅन्सर :** या प्रकारचा कॅन्सर जेथे पुरुषास सुन्ता करीत नाहीत तेथे म्हणजे भारत, चीन आदि देशात आढळतो. तसेच, ख्रिस्ती, मुसलमान, यहूदी यांसारख्या सुन्ता करणाऱ्या धर्मीय लोकांत हा क्वचितच दिसून येतो. शिश्नाच्या टोकाला, चामड्याच्या खाली जो शिश्नमल (स्मेग्मा) जमा होतो, त्यामुळे याचा उद्भव होत असावा, असा समज आहे.

**गर्भाशय कॅन्सर :** हा कॅन्सरदेखील युरोप, अमेरिकेच्या मानाने भारतातच अधिक प्रमाणात (जवळ जवळ ३० पट !) आढळतो ! विवाहित स्त्रियांमध्ये विशेषतः ज्यांना अधिक मुले आहेत, त्यांच्यात हा कॅन्सर आढळतो. जरी याचे निश्चित कारण अज्ञात आहे, तरी तो शिश्नमलाच्या संभाव्य कॅन्सरोत्पादक गुणाशी संबंधित असावा, अशी धारणा आहे. शिश्नमल गर्भाशयातील नाजूक भागी पसरून याचा उद्भव होत असावा.

**ल्युकिमिया कॅन्सर :** हा रक्ताचा कॅन्सर होय ! दुसऱ्या महायुद्धात जपानमधील



हिरोशिमा व नागासाकी शहरात जे अणुबाँब टाकण्यात आले, त्यामुळे निर्माण झालेल्या रेडिओ अॅक्टीव्ह (किरणोत्सर्गीय) प्रभावामुळे लाखो लोकांना जो कॅन्सर झाला, त्यात रक्ताचा कॅन्सर मुख्य होता.

**रासायनिक कॅन्सर :** असे शेकडो रासायनिक पदार्थ आहेत की, ज्याच्या सतत संपर्काने या प्रकारचा कॅन्सर होतो. उद्योगधंद्यात उपयोगात आणल्या जाणाऱ्या निरनिराळ्या पदार्थांमुळे. उदा. एनिलीन डाय बनविण्याच्या कारखान्यातील कामगारांना मूत्राशयाचा कॅन्सर होतो. 'टार कोल'च्या संपर्कात येणाऱ्या श्रमिकांना कालांतराने त्वचेचा किंवा अन्य प्रकारचा कॅन्सर होतो.

**पित्ताशयाचा कॅन्सर :** पित्ताशयातील व्रण (पेप्टिक अलसर) काही वर्षांनी कॅन्सरचे रूप धारण करतो.

अनेक देशात शास्त्रज्ञांच्या 'टीम्स्' कॅन्सरविषयक सशोधन करण्यात अखंडपणे उद्योगरत आहेत. चालू शतकात कॅन्सर सबंधाने तीन–चार महत्त्वाचे शोध लागले.

## 'व्हायरस' व कॅन्सर

'व्हायरस' किंवा विषाणू इतके सूक्ष्म जीव असतात की, साध्या डोळ्यांनी तर राहोच, पण दुर्बिणीतूनसुद्धा ते दिसू शकत नाहीत ! 'इलेक्ट्रॉन मायक्रोस्कोप'च्या साहाय्यानेच ते दिसू शकतात. देवी, इन्फ्लुएंझा, पडसे आदि अनेक रोग अशा 'व्हायरस' मुळेच होतात. आणि 'व्हायरस' मुळेच कॅन्सरदेखील होतो, असे गेल्या काही वर्षांत निदर्शनास आले आहे. याचा आरंभीचा शोध उंदरीच्या स्तनाच्या कॅन्सरवरून लागला. असे अनेक विषाणू आहेत की, ज्यांच्यामुळे कॅन्सरचे जंतू उत्पन्न होतात. पायावर किंवा शरीराच्या इतर भागावर तिळासारखा जो डाग काही वेळा दिसून येतो, तो 'व्हायरस' मुळेच असतो असे सिद्ध झाले आहे.

माणसाला होणारा व्हायरस जन्य आणखी एक जातीचा कॅन्सर आहे. त्याला बर्किट ट्यूमर किंवा बर्किट कॅन्सर म्हणतात. आफ्रिकेच्या काही भागात लहान मुलांना होणारा हा कॅन्सर 'व्हायरस' मुळेच उद्‌भवतो. अशाच प्रकारचा कॅन्सर प्रयोगशाळेत आफ्रिकन माकडात उत्पन्न करण्यात आला होता !

विविध प्रकारचे धान्य, शेंगदाणे आदि खाद्यपदार्थांत एका विषारी घटकाची उत्पत्ती होते. तिलाच 'अॅफ्लाटॉक्सीन' नाव देण्यात आले आहे. 'अॅफ्लाटॉक्सीन' चा शोध भारताच्या व अन्य विकासमग्न देशांच्या दृष्टीने फार महत्त्वाचा आहे. ह्याचा शोध इतका अलीकडील म्हणजे फार तर गेल्या पाच वर्षांतील असल्यामुळे त्याचा उल्लेख कुठल्या आरोग्यशास्त्रावरील पुस्तकात किंवा इतर ग्रंथात सापडणार नाही. कारण अजून त्याबर सशोधन चालू आहे. भारतातील अनेक शास्त्रज्ञांनी दक्षिणेकडील काही भुईमुगाच्या शेंगात 'अॅफ्लाटॉक्सीन' आढळून आल्याची ग्वाही दिली आहे.

बऱ्याच दिवसांपासून हा प्रश्न सतावीत होता की, यकृताचा कॅन्सर पाश्चात्य

देशात क्वचित् का आणि तो भारत, चीन, जपान व आग्नेय आशियात तसेच आफ्रिकेत अधिक प्रमाणात का? आता त्याचे कारण प्रकाशात आले आहे. या देशात दारिद्र्य अमाप. त्यामुळे गरीबीतील असह्याय्य परिस्थितीला बळी पडून येथील बऱ्याच लोकांना शिळे किंवा बुरशी आलेले अन्न खावे लागते. असे दिसून आले आहे की, 'एस्पजिल्स फ्लावस' नामक एका विशिष्ट बुरशीमुळे अशा विषारी द्रव्याचा त्या अन्नात प्रादुर्भाव होतो की, ज्यामुळे यकृताचा कॅन्सर उद्भवतो!

येत्या काही वर्षांत अन्नातील या व अशाच अन्य विषारी पदार्थांचा शोध लागेल आणि अशा प्रकारच्या कॅन्सरला पायबंद घालता येईल, अशी आशा धरायला काही हरकत नाही.

कॅन्सरच्या संदर्भात या सिद्धांताचे प्रतिपादन अगदी नवीन असे आहे. प्रतिकार किंवा प्रतिरक्षण-शक्तीचा अर्थ सामान्यपणे असा आहे की शरीर कुठल्याही विजातीय पदार्थाला विरोध करते. ही क्रिया शरीराच्या दृष्टीने सामान्यतः हितावह असली तरी काही विशिष्ट परिस्थितीत विघातकही ठरते! याविषयी फार जोरात संशोधन सध्या चालू असून येत्या एक दोन दशकात प्रतिकारशक्ती सिद्धांतामुळे कॅन्सरच्या उत्पत्तीबद्दल अन्य प्रश्नांवर प्रकाश पडेल, आणि यापासून कसा बचाव करता येईल, हे कळेल.

## कॅन्सरपेशीचे पूर्वीकरण

कॅन्सरग्रस्त पेशीत आपोआप फेरबदल घडून येऊन त्या पूर्वावस्थेत येण्याच्या एका अद्भूत (अटो-रिमिशन) क्रियेचा शोध नुकताच ब्रिटनच्या इम्पिरियल कॅन्सर रिसर्च फंड या संस्थेन लावला आहे. ह्या शोध किती महत्त्वाचा आहे, हे वेगळे सांगणे नकोच! पेशीच्या पुनरपि, आपोआप पूर्ववत् शुद्ध होण्याच्या या चमत्कारावरून हे उघडच दिसते की, कॅन्सर पेशीच्या मध्यबिंदूमध्ये पूर्वीच्या पेशींचा गुणधर्म शिल्लक असतो. तेव्हा आपोआप होणाऱ्या या चमत्काराचा अधिक अभ्यास केल्यास या प्रक्रियेचे रहस्य साध्य करून घेता येईल.

त्याशिवाय, असेही निदर्शनास आले आहे की, शरीरातील नैसर्गिक प्रतिकारशक्ती कॅन्सरला दाबून टाकण्याच्या प्रयत्नात सतत कार्यरत असते. ही गोष्ट लक्षात घेता शस्त्रक्रियेच्या किंवा रासायनिक उपायांनी कॅन्सरपेशीचा समूळ नाश करण्याच्या मार्गापेक्षा उपरोक्त प्रक्रियेस अधिक चालना कशी देता येईल याकडे लक्ष केंद्रित करणे सुज्ञपणाचे ठरेल.

सारांश, सर्व जगभर कॅन्सरविषयक संशोधन इतक्या जोरात चालू आहे की हा रोग आता फार काळ असाध्य वा अजिंक्य राहाणार नाही, अशी वेळ लवकरच येईल!!

□ □ □

## दूर कोठेतरी सुटी घालविण्याचे स्वप्न पहात आहात ?

# सोनेरी सुटीसाठी गोव्याला भेट द्या.

- मैलोन् मैल पसरलेला चंदेरी समुद्रकिनारा व प्रशांत सागर-लहरी आपणांस क्रीडा वा आराम यांसाठी आमंत्रण देत आहेत. सूर्यप्रकाशात न्हाऊन निघालेल्या रेतीवर, थंड पश्चिमी झुळुकांनी रात्रंदिवस ताजेतवाने व्हाल.

- काळावर मात करणारी अतिभव्य देवालये व किल्ले यांच्या दर्शनासाठी सुप्रसिद्ध ऐतिहासिक स्थळांना भेट द्या.

- आरामगाड्यांतून तुम्हाला रोज किफायतशीर दरात प्रेक्षणीय स्थळांना भेटी देता येतील.

- नवीन आनंदासाठी क्रीडापटू मंडळींना जलारोहणाची सुसंधी आहे. आधुनिक वेगवान बोटीतून तुम्ही जलक्रीडा करू शकाल.

- कळंगुट व कोळवा या जगप्रसिद्ध किनाऱ्यांवर राहण्यासाठी अत्याधुनिक व आरामशीर प्रवासी-घरांची उत्तम सोय आहे.

- गोव्याच्या सौंदर्याचा आस्वाद घेण्यास चुकू नका. दूधसागर, अरवालोम हे धबधबे, सोनेरी किनारे, जुन्या गोव्यातील चर्चेस, फोंडा देवालये इत्यादीस जरूर भेट द्या.

टूरिस्ट ब्यूरो
डिपार्टमेंट ऑफ इन्फर्मेशन अँड टूरिझम
गव्हर्न्मेंट ऑफ गोवा
दमण, दीव, पणजी
दूरध्वनी : ७७३

काँग्रेसला आजतरी स्थान नाही. जुनी काँग्रेस हे चार प्रदेश सोडले तर कुठेही फारशी प्रबळ नाही. बंगाल डाव्या कम्युनिस्ट–नक्षलवाद्यांच्या कोंडीत आहे; तर केरळा-तही काही अशी कम्युनिस्टाचंच प्रभुत्व आहे. बहुतेक प्रांतांतनं अखिल भारतीय पक्षाना 'प्रांतिक पक्ष' डोईजड होत आहेत. अशा परिस्थितीत आघाड्याशिवाय कुठल्याही पक्षाला गत्यंतर नाही. आघाड्यांच्या पाठोपाठ बधनं आली, 'आयाराम-गयाराम' आले. हे सारं कितीही म्हटलं तरी टाळण कठीण आहे. अर्थात काही अनपेक्षित घडल तर गोष्ट वेगळी. एरवी ही अनिश्चितता अटळ आहे. मग भले खा. जगजीवनराम किंवा खा. डॉ. रामसुभग सिंग काहीही म्हणोत. भारतीय पातळीवर नव्हे, पण प्रांतिक पातळीवर समझोते कदाचित करावे लागतील, असं जेव्हा नवकाँग्रेसचे अध्यक्ष बाबू जगजीवनराम म्हणतात तेव्हा त्याचा अर्थच हा की त्यानाही ही अनिश्चितता उघड उघड दिसते आहे.

जोपर्यंत एक प्रबळ पक्ष आणि एक दुसरा तुल्यबल विरोधी पक्ष अस्तित्वात येत नाहीत तोपर्यंत ही अनिश्चितता कायम राहणार आहे. त्यातून अराजकवाद्याच, कम्युनिस्टाच फावणार आहे. त्यामुळे एकतर लोकशाही धोक्यात तरी येईल किंवा तिचा फार्स चालू राहील. आणि जनरल करिआप्पासारखे उद्‌गार सगळीकडून ऐकू येतील. हें टाळायच असेल तर प्रमुख राजकीय पक्षांच्या ध्रुवीकरणाच्या दिशेने पावल त्वरीत पडली पाहिजेत. काँग्रेसच्या फाटाफुटीनतर अशा ध्रुवीकरणाची आशा बळावली होती. पण नतर त्या फुटीचे परिणाम केवळ इतर पक्षाच्या फाटाफुटीतच दिसून आले. गोंधळ अधिकच वाढला. आज हे टाळायचं असेल तर, प्रमुख पक्षांनी आपापल्या भूमिका तपासून पाहायला हव्यात. गभीरपणे अतर्मुख होऊन विचार करा-यला हवा. लोकशाहीवादी म्हणविणाऱ्यांवर ही खरी मोठी जबाबदारी आहे. नक्षल वादी डावे कम्युनिस्ट ह्यांचे वाढते अत्याचार, पाकिस्तान–लालचीन ह्यांची अण्वस्त्र-सपन्न आघाडी ह्यांनी लोकशाहीवाद्यांना आव्हान दिलेलं आहे. दोन्ही काँग्रेस, ससोपा, प्रसोपा, जनसंघ, स्वतंत्र, शेकाप, रिपब्लिकन्स ह्यांच्यावर हे आव्हान स्वीकार ण्याची जबाबदारी. अन्यथा ह्या देशावर हुकूमशाही किंवा कम्युनिझम (चिनी किंवा रशियन) लादल्याबद्दल इतिहास ह्याच पक्षांना जबाबदार धरील. ◻

## २८ मे : दवाखाने बंद !

इन्शुअरन्स मेडिकल प्रॅक्टिशनर्स असोसिएशन, मुंबई (ESIS) ह्याच्या कृति-समितीने दिलेल्या आदेशानुसार कामगार विमा योजनेखालील डॉक्टर्स आणि वैद्य यांनीं आपापले दवाखाने गुरुवार २८ मे, १९७० यादिवशी बंद ठेवले. त्यांना

सहानुभूती म्हणून अन्य डॉक्टर्सही त्या दिवशी सपावर गेले होते. मात्र डॉक्टरांच्या मागण्यांचा विचार होत असतानाच, एकूण कामगार विमा योजनेचाच पुन्हा एकदा सर्वांगीण विचार होण आवश्यक आहे.

मुबई, पुणे, नागपूर, सोलापूर आदि महत्त्वाच्या शहरांतून, सुमारे २१०० डॉक्टर्स ह्या योजनेखाली येतात. अदाजे तीन ते चार लाख कामगार व त्यांचे कुटुंबीय कामगार विमा योजनेखाली नोदले गेले आहेत. म्हणजे साधारणतः प्रत्येक डॉक्टर-मागे दीडशे ते दोनशे कामगार येतात. प्रत्येक कुटुबामागे डॉक्टरांना वार्षिक १७:५० एवढं मानधन मिळतं. हे मानधन ह्या डॉक्टरांच्या लढयाचा मुख्य विषय. ह्या खेरीजही त्यांच्या इतर छोटया मोठया तक्रारी आहेतच. डॉक्टरांकडे नोंद झालेले कामगार जवळजवळ दोनशेच्या आसपास असले, तर शासकीय नोंदवह्या ते जेमतेम सव्वाशे असल्याचं दाखवतात. अर्थात शासनातर्फे डॉक्टर्सना पैसे मिळतात ते नोदवहीला अनुसरून. ह्या नोंदवह्या कधीच पूर्ण नसतात. आणि त्याविषयी अधिकाऱ्यांकडे तक्रारी केल्या तर त्याची दखलच घेतली जात नाही. तीच गोष्ट औषध आणि इतर साधनसामुग्री ह्याची. आधी मुळातच, काही मोजकीच औषधं ह्या योजनेखाली कामगारांना मिळू शकतात. तीही वेळेवर न मिळाल्याने अडचणी अधिकच वाढतात. औषधांविषयीची तक्रार तर औषध-विक्रेत्याचीही आहे. साधी सर्टिफिकेट-पुस्तके देखील वेळेवर मिळत नाहीत. त्यासाठी सतरा खेटे घालावे लागतात. त्याना मिळणारी अपमानास्पद वागणूक, प्रत्येक पेशटमागे अवघ्या रुपयापर्यंतच औषधाची शिफारस करण्याच व त्यासारखी अनेक किचकट बधने, वगैरे अनक कारणं डॉक्टरानी ह्या 'बंद'च्या मागे दाखवली आहेत. 'रोग्यांची गैरसोय करण्याचा उद्देश ह्या बंदमागे नसून, डॉक्टरांच्या तक्रारी दूर व्हाव्यात व


## सरदारगृह

[मुंबईत स्थापना – सन १८९८]

राहण्याची व भोजनाची उत्तम सोय
मगलकार्ये व मेजवान्या यासाठी सोईस्कर ठिकाण

**आमची वैशिष्टये**

- प्रशस्त व हवेशीर खोल्या
- अद्यावत् पद्धतीचे भोजनगृह
- टिळक हॉल – लोकमान्यांचे सरदारगृहात केलेले स्मारक

**सरदारगृह प्रा. लिमिटेड**

**फुले (क्रॉफर्ड) मार्केटजवळ मुंबई २ बी. आर.**

रोग्यांची सेवा कार्यक्षमतेने करता यावी ह्याच हेतू आहे' असं डॉक्टरांची कृतिसमिती म्हणते.

डॉक्टर लोकांनी लढ्याची भाषा चालू केली असताना, ह्या योजनेखालील कामगारांना, ह्या योजनेचा कितपत फायदा होतो तेही पाहिलं पाहिजे. ह्या योजनेत अंतर्भूत असलेल्या अनेक लोकांशी ह्या दृष्टीने मी बोललो. बहुतेक लोक, ह्या योजनेचा जास्तीत जास्त उपयोग सुट्याकडे करून घेतात. किंबहुना गैरहजर राहायचं असलं तरच विमा–डॉक्टरांकडे जाणारे अनेक आहेत. काही प्रसंगी दीर्घ आजारपण किंवा दीर्घ मुदतीची रजा तब्येतीस्तव घेतल्यास कामगार विमा-योजनेनुसार मिळणारा पगार घेण्यासाठीही विमा योजनेचा फायदा उचलला जातो. परंतु नेहमीच्या व मोठ्या दुखण्यांसाठी विमा–योजनेतर्फे औषधोपचार करवून घेणाऱ्यांची संख्या जेमतेम पाच टक्क्यांपर्यंत असावी. बहुसंख्य कामगार स्वतःच्या वा कुटुंबियांच्या आजारपणात पदरचा पैसा खर्च करूनच उपाययोजना खाजगीरित्या करवून घेतात. विमा-योजना डॉक्टरांकडे केवळ सर्टिफिकेट पुरते जातात. ह्याचीही अनेक कारणं दिली जातात. त्यातली महत्त्वाची म्हणजे ह्या योजनेखाली असलेली औषधं हलक्या प्रतीची असतात, व औषधाविषयी शिफारशी करण्यात डॉक्टरांवर लादलेली बंधनं! शिवाय विमा योजनेच्या विविध ऑफिसेसमधून असलेली अंदाधुंदी, कामं होण्यास लागणारा भयानक वेळ वगैरे नेहमीची सरकारी व्यवस्थेला चिकटलेली कारणं आहेतच. ह्या साऱ्यामुळे, मूळची कल्याणकारी योजना, आज केवळ लोकाना कामावरून गैरहजर राहण्यासाठी आवश्यक सर्टिफिकेट मिळवून देणारी योजना बनली आहे. कामगारांच्या अनुपस्थितीस हातभार लावणारी योजना बनली आहे.

ह्या सर्व पार्श्वभूमीवर ह्या योजनेचीच संपूर्ण फेररचना होणं आवश्यक आहे. महाराष्ट्र शासनानं ह्या बाबतीत त्वरीत पावलं उचलावीत. औद्योगिक कामगारांचाच ह्या योजनेत प्रामुख्याने समावेश होता. त्यांच्या जीवनाशी निगडीत असणारे काही कार्यकर्ते, त्यांच्या रोगांशी परिचित असणारे काही डॉक्टर्स, इतर काही तज्ञ डॉक्टर्स वगैरेंची समिती नेमून योजनेचा, कामगाराच्या जीवनाचा, डॉक्टरांच्या तक्रारीचा संपूर्ण अभ्यास झाला पाहिजे. आणि समितीच्या शिफारशी त्वरित अंमलात आणल्या गेल्या पाहिजेत. हे झालं तरच ह्या 'बंद'नी काही साधलं असं म्हणता येईल. नाहीतर इतर अनेक 'बंद'प्रमाणेच हा 'बंद'ही हवेत विरून जाईल.

□ □ □

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक, संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव पेठ, पुणे ३० येथे छापून, १०२५ सदाशिव पेठ, पुणे येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. श्री. ग. माजगावकर

चंद्रशेखर आझाद,

सुखदेव

राजगुरू

भगतसिंग

......

हिंदुस्थान

सोशॅलिस्ट

रिपब्लिकन

आर्मीचे

धुरंधर सेनापती

आणि सैनिक

यांच्या हौतात्म्याची

वीरगाथा

# अग्निपुत्र

'माणूस 'मधून सादर
झालेली लेखमाला
लवकरच पुस्तकरूपाने
प्रकाशित होत आहे.

अधिक तपशील
पुढील अंकी.

MANOOS ( Weekly ) : 40 Paise : Regd. No. M–H 649



"जनतेला दिलेली आश्वासनं आपण जर लौकरात लौकर अमलात आणली नाहीत तर, मी आताच इशारा देऊन ठेवतो, त्याचे अत्यंत गंभीर व महाभयंकर परिणाम झाल्यावेरीज राहणार नाहीत–७२ च्या निवडणुकीत आपल्या हाती सत्ता राहणार नाही .."